cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१३२ | सोमवार दि.०२ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

शिंदे–दादा गटातील वादात भाजपा बघ्याच्या भूमिकेत

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरूवात झाली आहे. मात्र, ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरच सत्ताधारी महायुतीमधील घटक पक्षांमध्ये बेदिली माजल्याचे दिसून येते. शिंदे गट व अजितदादा गटातील वर्चस्वाचा वाद आता विकोपाला गेला असून, हा अंतर्गत संघर्ष युतीकरिता तापदायक ठरण्याची चिन्हे आहेत. हे पाहता हा वाद मिटविण्यात भाजपाला यश येणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. एकनाथ शिंदेंना सोबत घेत भाजपाने राज्यात सेना व भाजपा युतीचे सरकार स्थापन केले.

आरोपी अक्षय शिंदेची पीडित चिमुकलीसमोर ओळख परेड

बदलापूरः बदलापुरातील शाळेत दोन चिमुकलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणी आरोपी अक्षय शिंदेची अखेर ओळख परेड झाली. कल्याण न्यायालयामध्ये एका विशिष्ठ रूम मध्ये ही ओळख परेड पार पडली. विशेष म्हणजे नॉन रिफ्लेक्टेड काचेच्या माध्यमातून ही ओळख परेड झाल्याने पीडित मुलगी आरोपीला पाहू शकत होती. मात्र आरोपीला पीडित मुलगी दिसत नव्हती. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ओळख परेड दरम्यान पुरेपूर दक्षता घेण्यात आली. याप्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या एसआटीने न्यायालयात आरोपीच्या ओळख परेडसाठी परवानगी मागितली होती. त्यानुसार ही परवानगी मिळाल्यानंतर ही ओळख परेड पार पडली.

मराठवाड्यात पाणी पाणी..!

सर्वदूर पावसाने पाण्याची चिंता मिटली, जायकवाडीसह सगळ्याच धरणांच्या पातळीत वाढ

शेकडो हेक्टर शेतीचेही नुकसान

मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आला असून शेकडो हेक्टर शेती पाण्यासाठी गेल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. जिंतूर तालुक्यातील अकोली,भोसी,वरुड(नृ), बलसा, मालेगाव, पाचलेगाव, दगडचोप, चारठाणा,निरवाडी, अंबरवाडी,अंगलगाव, सोन्ना, आडगाव, बेलखेडा, पिंप्राळा या गावांमध्ये नदीपात्र फुटुन शेत पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. सोयाबीन,कापूस, हळदीसह इतर खरीप पिकांचेदेखील मोठे नुकसान झाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्यात जोरदार मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. अरबी समुद्रात घोंघावणाऱ्या चक्रीवादळाने पावसाचा जोर वाढला आहे. दरम्यान, मराठवाड्याची पाण्याची चिंता आता मिटली आहे. हजारो गावांची तहान भागवणारे जायकवाडी धरण आता ८५ टक्क्याच्या जवळ भरले आहे. याशिवाय मराठवाडा विभागातील सर्वच धरणांमधील पाणीसाठा आता हळूहळू वाढू लागला आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी पावसाला सुरुवात झाली आहे.

लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पहाटेपासून हलक्या पावसाला सुरुवात झाली. धरण क्षेत्रातही पाऊस होत असल्याने दिलासादायक चित्र आहे. मराठवाडा विभागातील हजारो गावांची तहान भागवणारे आणि सर्वाधिक क्षमता असणारे जायकवाडी धरण ८४.१२ टक्क्यांनी भरल्याचे जलसंपदा विभागाने सांगितले. जायकवाडी धरण क्षेत्रात एक जूनपासून आतापर्यंत ४६२ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. मागील वर्षी एक जून २०२३ दरम्यान झालेला पाऊस १५५ मिमी एवढाच होता. बीड जिल्ह्यातील धरणं मागील वर्षीच्या तुलनेत यंदा काही प्रमाणात अधिक ◀◀ पान २ वर

बीड जिल्ह्यातील नदी काठच्या गावांनी सतर्क राहावे– धनंजय मुंडे

मुंबई ।प्रतिनिधी

संपूर्ण बीड जिल्ह्यात ३१ ऑगस्ट च्या सायंकाळपासून ते आतापर्यंत सातत्याने सर्व दूर पाऊस पडत असून जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलाशय कुटुंब भरून नदीला आले खळखळून वाहू लागले आहेत. जिल्ह्यावरील जलसंकट दूर झाल्याची बातमी जरी आनंददायक असली तरी सततच्या पावसाने अतिवृष्टीचा धोका निर्माण झाला असून त्यामुळे खरीप हंगामातील शेती पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. तर काही महसूल मंडळांमध्ये २४ तासांमध्ये अतिवृष्टीच्या निकषांप्रमाणे किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडला असून, राज्य शासनाच्या महसूल विभागाने यापूर्वीच काढलेल्या आदेशाला अनुसरून महसूल व कृषी विभागाने पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांच्या तसेच घरांच्या पडझडीच्या आदी नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व शेती पिकांच्या ३३% च्या मर्यादेपेक्षा जास्त नुकसानीचे अहवाल राज्य शासनाकडे मदतीच्या मागणीसह तातडीने पाठवावेत असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप हंगामात एक रुपयात पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून आपल्या शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती विमा कंपनीच्या नियमानुसार विमा कंपनीला देखील निर्धारित वेळेत ◀◀ पान २ वर

मालवणमध्ये उभारलेला पुतळा भ्रष्टाचाराचा ; शिवप्रेमी जनतेचा अपमान केला

जोडे मारो आंदोलनात शरद पवार यांचा आरोप

मुंबई । प्रतिनिधी

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान करण्याची भूमिका आजच्या राज्यकर्त्यांनी घेतली. मालवणजवळ शिवछत्रपतींचा पुतळा वाऱ्याने उद्ध्वस्त झाला असे विधान राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केले. आज आपण 'गेट वे ऑफ इंडिया'ला उभे आहोत, याही ठिकाणी शिवछत्रपतींचा पुतळा आहे. हे शिल्पही सागरी किनाऱ्याजवळच आहे. तरीही गेली ५० वर्ष हे शिवछत्रपतींचे शिल्प लोकांना प्रेरणा देत असल्याचे शरद पवार म्हणाले.

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी राज्यातील महायुती सरकारच्या विरोधात रविवारी जोडे मारो आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्यानिमित्ताने हुतात्मा चौक ते गेट वे ऑफ इंडिया दरम्यान मोर्चाही काढण्यात आला. या मोर्चाचा समारोप गेट वे येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ◀◀ पान २ वर

पंतप्रधानांनी माफी कशाची मागितली? हे सरकार शिवद्रोही – उद्धव ठाकरे

उद्धव ठाकरे म्हणाले की, नुकतेच पंतप्रधान आले होते. त्यावेळी त्यांनी माफी मागितल्याचे पाहिले. पण माफी मागतानाही त्यांच्या आवाजात सत्तेची मग्रुरी असल्याचे दिसून आले. बोलण्यात मग्रुरी ठेवत, नुसते तोंडातून नतमस्तक म्हणून बोलण्यातून माफी मागितले असे होत नाही, त्यावेळी तेथेच असलेले उपमुख्यमंत्री मात्र हसत होते. परंतु पंतप्रधानांनी नेमकी कशाची आणि कशाबद्दल माफी मागितली असा सवाल करत पंतप्रधानांनी पुतळा घाईत उभारला म्हणून माफी मागितली की, कोसळून पडला म्हणून माफी मागितली की, शिवद्रोह्यांना सत्तेत सहभागी करून घेत त्यांच्या हाती सत्ता सोपवली म्हणून माफी मागितली असा सवालही यावेळी पंतप्रधानांना केला.

ही भाजपाची पेशवाई वृत्ती, चुकीला माफी नाही – नाना पटोले

भाजपा सरकारने कमिशनखोरी व भ्रष्टाचार करून छत्रपती शिवरायांचा अपमान करण्याचे पाप केले आहे. मालवणमध्ये शिवरायांचा फक्त पुतळाच पडलेला नाही तर महाराष्ट्र धर्म पायदळी तुडवला व महाराष्ट्राचा अवमानही केला. शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहेत, खोके सरकारने आमच्या दैवतांचा अपमान केला. विधानसभा निवडणुकीचा काळ असल्याने पंतप्रधान व मुख्यमंत्री यांनी माफी मागितली पण हे पाप अक्षम्य आहे. या चुकीला माफी नाही, असा सज्जड इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्यातील महायुती सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव न घेता दिला.

न्याय मिळेपर्यंत, त्यांचे जीवन संपले तर....

प्रलंबित खटल्यांवर राष्ट्रपतींची टिप्पणी

नवी दिल्ली । वृतसंस्था

आपल्या देशातील खेड्यापाड्यातील लोक न्यायव्यवस्थेला ''दैवी'' मानतात. त्यांना तेथे न्याय मिळतो. भगवान के घर देर है अंधेर नही, अशी हिंदीत एक म्हण आहे; पण विलंब किती काळ? तो किती काळ असू शकतो? याचा विचार करणे आवश्यक आहे. कोणाला न्याय मिळेपर्यंत, त्यांचे हसू नाहीसे झाले असेल, त्यांचे जीवन संपले असेल तर आपण यावर खोलवर विचार केला पाहिजे,'' अशा शब्दांमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी (दि.१ सप्टेंबर) देशातील न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांवर बोट ठेवले. त्यांनी देशात जलद न्याय सुनिश्चित करण्याचे ◀◀ पान २ वर

शिक्षा माफ करण्याची आसाराम बापूंची विनंती फेटाळली

अहमदाबाद । वृत्तसंस्था

बलात्काराच्या गुन्ह्या प्रकरणी शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूने शिक्षा रद्द करण्याची मागणी करत गुजरात हायकोर्टामध्ये धाव घेतली. तसेच या प्रकरणात आधीपासूनच बराच काळ तुरुंगात असल्याने आपल्याला झालेली शिक्षा रद्द करावी, अशी मागणी न्यायाधीशांसमोर केली. आसाराम बापूच्या या याचिकेवर सुनावणी करताना न्यायाधीशांनी या अर्जावर विचार करण्यासाठी कुठलाही असामान्य आधार नसल्याचे सांगत तो फेटाळला.

२०२३ मध्ये गांधीनगर येथील एका न्यायालयाने बलात्काराच्या खटल्यामध्ये आसाराम बापूला ◀◀ पान २ वर

निवडणुकीच्या तोंडावर शेतकरी प्रदर्शन हा इव्हेंट जनतेला चांगलाच भावला

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदार संघाला भिमराव धोंडे यांच्या नावाची गरज आहे. एवढ्या ताकदीचे व्यक्तीमत्व मतदारसंघात दुसरे नाही. शेतकरी आणि शिक्षण या दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे माजी आमदार भीमराव यांचा श्वासोच्छ्वास आहे असे ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांनी सांगितले . आपण मतदारसंघासाठी मोठे कार्य केले आहे. याचे फळ निश्चित मिळेल. ◀◀ पान २ वर

परळी : राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राज्याचे कृषिमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांची परळी तालुक्यातील नाथरा येथे भेट घेऊन त्यांचे आभार व्यक्त करताना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत दिसत आहेत. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अविनाश उगले, परळी तालुकाध्यक्ष शितलदास अडसुळे समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे,आदी उपस्थित होते.

क्रॉप इन्शुरन्स ॲपवर नुकसानीची तातडीने नोंदणी करा

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आ.संदीप क्षीरसागरांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची माहिती बीड मतदारसंघासह जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी तातडीने क्रॉप इन्शुरन्स ॲपवर करावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

संपूर्ण बीड जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून सतत जोरदार पाऊस सुरू आहे. झालेल्या पावसाने जिल्ह्यातील सर्व जलसाठे जवळपास संपूर्ण भरलेले आहेत. परंतु या पावसामुळे शेतातील सर्व प्रकारच्या पिकांचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. सर्व शेतकरी बांधवांनी पिक विमा भरला आहे. परंतु विमा मिळण्याकरिता झालेल्या नुकसानीची माहिती ७२ तासांच्या आत क्रॉप इन्शुरन्स ॲपवर भरणे आवश्यक आहे. त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील तसेच संपूर्ण बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती क्रॉप इन्शुरन्स ॲपच्या माध्यमातून विमा कंपनीकडे नोंदवावी जेणेकरून पीक विमा मिळेल. असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३१ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : १.५० क्विंटल			
	२,६२१	२,६२१	२,६२१
ज्वारी/हायब्रिड : ३४.०० क्विंटल			
	२,२००	२,५६०	२,३५१
मूग : ५१.५० क्विंटल			
	६,३००	८,२६१	७,६९०
तूर : १.०० क्विंटल			
	८,५००	८,५००	८,५००
उडीद : ३२.०० क्विंटल			
	७,१००	८,११०	७,६८२
बाजरी:४.००क्विंटल			
	२,३७०	२,५९२	२,४८१
चिंच/लोकल: २०.०० क्विंटल			
	१,१००	३,५५०	२,३२५
सोयाबीन: १५.०० क्विंटल			
	४,५००	४,५००	४,५००
हरभरा: ०.५० क्विंटल			
	६,४००	६,४००	६,४००

सर्वोच्च न्यायालयाला मिळाला नवा ध्वज आणि चिन्ह!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाला रविवारी नवीन ध्वज आणि चिन्ह मिळाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन ध्वज आणि चिन्हाचे अनावरण केले.

नवी दिल्ली येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी यांनी न्याय आणि लोकशाहीचे प्रतीक असलेला हा नवा ध्वज आणि चिन्हाची कल्पना सादर केली आहे. या नवीन ध्वजात अशोक चक्र, सर्वोच्च न्यायालयाची इमारत आणि संविधानाचे पुस्तक दाखवण्यात आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीत जिल्हा न्यायपालिकेची राष्ट्रीय परिषद सुरू होती. या संमेलनाच्या

राष्ट्रपतींच्या हस्ते झाले अनावरण

समारोपाला राष्ट्रपतींनी हजेरी लावली होती. जिल्हा न्यायपालिकेच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ध्वज आणि चिन्हाचे अनावरण करण्यात आले. भारताचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड हेही यावेळी उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या नव्या ध्वजचा व्हिडीओ समोर आला असून, ज्यामध्ये हा ध्वज आणि चिन्हाबद्दल माहिती देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या नवीन ध्वजावर संस्कृत श्लोक यतो धर्मस्ततो जयः असे लिहिण्यात आले आहे. ज्याचा अर्थ जेथे धर्म असेल तेथे विजय होईल असा होतो. तर ध्वजावर सर्वात वरती अशोक चक्र मध्ये सर्वोच्च न्यायालयाची इमारत आणि सर्वात खाली संविधान दाखवण्यात आले आहे.

cmyk

अग्रलेख

शिंदे – दादा गटातील वादात भाजपा बघ्याच्या भूमिकेत

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरूवात झाली आहे. मात्र, ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरच सत्ताधारी महायुतीमधील घटक पक्षांमध्ये बेदिली माजल्याचे दिसून येते. शिंदे गट व अजितदादा गटातील वर्चस्वाचा वाद आता विकोपाला गेला असून, हा अंतर्गत संघर्ष युतीकरिता तापदायक ठरण्याची चिन्हे आहेत. हे पाहता हा वाद मिटविण्यात भाजपाला यश येणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. एकनाथ शिंदेंना सोबत घेत भाजपाने राज्यात सेना व भाजपा युतीचे सरकार स्थापन केले. त्यानंतर काही काळातच अजितदादांची राष्ट्रवादीही युतीमध्ये सामील झाली. मात्र, सरकारमध्ये अजितदादा गट सहभागी झाल्यापासून शिंदे व दादा गटात सातत्याने वाद होताना दिसतात. परस्परांवर कुरघोड्या करण्याची एकही संधी दोन्ही पक्षांनी सोडलेली नाही. लाडकी बहीण योजनेच्या श्रेयावरूनही शिंदे व दादांमध्ये रंगलेला कलगीतुरा सर्वांनी पाहिला, अनुभवला आहे. आता मंत्री तानाजी सावंत यांच्या एका व्हिडिओने दोन्ही पक्षांमध्ये वादाची ठिणगी पडल्याचे दिसून येते. सध्या याबाबतचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यातून महायुतीत तणाव निर्माण झाला आहे. आमचे काँग्रेस व राष्ट्रवादीशी कधी जमले नाही. पॅबिनेटमध्ये आम्ही मांडीला मांडी लावून बसतो. पण, बाहेर आल्यावर उलटी आल्यासारखे होते, हे सावंत यांचे विधान त्याकरिता कारणीभूत ठरले आहे.

शिंदे गटात वादग्रस्त मंत्र्यांची कमी नाही. भडकाऊ विधाने करण्याची त्यांच्यात जणू स्पर्धाच लागलेली असते. युती सरकारमध्ये त्यांचा सहभाग असला, तरी एकपक्षीय सरकारचे प्रतिनिधी असल्यासारखेच त्यांचे वर्तन असते. त्यात एकाला झाकावे नि दुसऱ्याला काढावे, अशीच शिंदे व दादा गटाची अवस्था. शिंदेंच्या नेत्यांनी ब्र उच्चारावा नि त्यांचे वाक्य पूर्ण होण्याच्या आतच दादा मंडळींनी प्रतिक्रिया द्यावी, असा हा सगळा सुपरफास्ट मामला आहे. त्यामुळे दादांच्या राष्ट्रवादीचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी तानाजी सावंत यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची केलेली मागणी त्याला साजेसीच ठरते. अन्यथा, आम्हालाच मंत्रिमंडळातून बाहेर पडावे लागेल, असा इशाराही पाटील यांनी देऊन ठेवला आहे. आत्तापर्यंत शिंदे व दादा गटात वारंवार वाद झाले आहेत. भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी त्यात वेळोवेळी मध्यस्थी करीत त्याचे निवारणही केले. परंतु, फडणवीस यांची शक्ती केवळ या दोघांमधील वाद मिटविण्यात खर्ची होत असेल, तर हे घाट्याचेच राजकारण ठरते. वास्तविक, बदलापूरमधील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व मालवणमधील शिवरायांचा पुतळा कोसळण्याचे प्रकरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना व्यवस्थित हाताळता आले नाही, अशी सार्वत्रिक भावना आहे. भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनाही असेच वाटते. त्यामुळे भविष्यातही आपला मार्ग निर्वेध राहील, असे शिंदेंना गृहीत धरता येणार नाही. बिहारमध्ये भाजपाने नितीशकुमार यांचे नेतृत्व मान्य केले. महाराष्ट्रातही भाजपा बिहारच्या पॅटर्नप्रमाणे शिंदे यांच्याकडेच मुख्यमंत्रिपद सोपविणार असल्याची चर्चा होती. तथापि, मागच्या काही दिवसांतील घटना, शिंदे यांच्याबद्दलची नाराजी बघता याला बगल दिली जाण्याची शक्यता संभवते. बदलत्या परिस्थितीनंतर महाराष्ट्रात रा. स्व. संघही सक्रिय झाला आहे. त्यामुळे युतीची सत्ता आली, तर नेतृत्व बदल करण्याच्या दृष्टीनेही आत्तापासूनच हालचाली सुरू झालेल्या दिसतात. संघाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. त्यामुळे सत्ता मिळविण्यात यश आल्यास नागपूरमधील महत्त्वाच्या नेत्याच्या खांद्यावर नेतृत्वाची कमान सोपविली जाण्याची दाट चिन्हे आहेत. स्वाभाविकच शिंदे व दादा गटातील वादात सध्या तरी भाजपाने बघ्याची भूमिका घेतल्याचे दिसते.

उद्धव ठाकरे यांना शह देण्यासाठी भाजपाने शिंदेंकडे मुख्यमंत्रिपद सोपवले. आधी फडणवीसांच्या साथीने राज्य हाकणाऱ्या शिंदेंनी हळूहळू कारभारावर पकड मिळविली आणि नंतर सगळा फोकस आपल्यावर ठेवण्यात यश मिळविले. मराठा आरक्षण मुद्द्यावर भाजप व फडणवीस खलनायक ठरले. पण, शिंदे सेफ राहिले. लोकसभा निवडणुकीत एकीकडे भाजप सपाटून मार खात असताना शिंदेसेना तग धरून राहिली. लाडकी बहीण योजनेतही सर्वाधिक बोलबोला झाला तो शिंदेंचा. अशा अवजड झालेल्या या नेतृत्वाला परस्पर शह बसत असेल, तर का नको, असा विचार शीर्षस्थ नेतृत्वाने केला असावा. त्यामुळे शिंदेंचा काटा काढण्यासाठी आगामी काळात फडणवीस व अजितदादा आतून एकत्र आले, तर नवल मानायचे कारण नाही.

महायुतीचे जागावाटप कसे होणार, यावर आत्तापासूनच चर्चा सुरू आहेत. त्यात भाजपाला ११० ते १२०, शिंदे गट ७० ते ७५, तर दादा गटाला ५० ते ६० जागा मिळतील, असा अंदाज वर्तविला जातो. मात्र, दोन्ही पक्षांचे समसमान आमदार असताना शिंदे गटाला वेगळा न्याय का, याकडे राष्ट्रवादीतील नेते लक्ष वेधत आहेत. त्यामुळे जागा वाटपापासून ते जागा जिंकण्यापर्यंत प्रत्येक पातळीवर शिंदे व दादा गटात संघर्ष झडू शकतो. स्वाभाविक परस्परांचे उमेदवार पाडण्याचे प्रयत्नही दोन्ही बाजूकडून होऊ शकतात. तसे झाल्यास त्याचा फटका अंतिमत: महायुतीला बसू शकतो. त्यामुळे या दोहोंतील संबंध अधिक ताणणार नाहीत, याचीही भाजपाला दक्षता घ्यावी लागेल.

राज्यातील चर्मकार समाजाने एकजूट दाखवून आपले हित साधावे-बबनराव घोलप

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने आयोजित समाज जनजागृती अभियानाची सांगता

अंबाजोगाई/ पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात समाज जनजागृती अभियान दौरा आयोजित केला आहे. या समाज जनजागृती अभियानाची सांगता दि ०१ सप्टेंबर रोजी पुणे शहरातील येरवडा परिसरात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या सांगता कार्यक्रमास राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी समाजकल्याण मंत्री मा बबनराव घोलप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाली. यावेळी त्यांनी राज्यातील सर्व चर्मकार समाजबांधवानी एकजूट दाखवून आपले हित जोपासण्याचे आवाहन बबनराव घोलप यांनी केले.यावेळी व्यासपीठावर आमदार राजेंद्र टिंगरे, आमदार रविंद्र धंगेकर, प्रमा आ जगदीश मुळीक, बापूसाहेब पठारे, प्रा शशिकांत सोनवणे उपाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघ, प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड ,मराठवाडा उपाध्यक्ष इंजि एन. डी शिंदे, सुदाम लोखंडे, पंढरीनाथ पवार, भानुदास विसावे कार्याध्यक्ष, एँड आनंद गवळी, माधवराव गायकवाड प्रदेशाध्यक्ष, दत्तात्रय गोतिसे,रो शांताराम कारंडे, रविंद्र राजुस्कर, , राज्य प्रवक्ते महाराष्ट्र राज्य युवा प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्र खैरे , श्रीमती उर्मिला ठाकरे, सरोज बिसुरे,युवा प्रदेशाध्यक्ष मा. अमर तांबेकर यांची उपस्थिती होती.

या सांगता कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सर्व महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड यांनी केले. यावेळी त्यांनी राज्यात चर्मकार समाजावर होणारे अन्याय, युवकांची पिळवणूक यावर उपस्तिथ मान्यवरांचे लक्ष वेधले. या कार्यक्रमात इंजि एन डी शिंदे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करतांना चर्मकार समाजाला राजकारणात देखील मोठ्या प्रमाणावर स्थान मिळाले पाहिजे. जेणेकरून चर्मकार समाजातील युवक, बेरोजगार तथा पारंपरिक चर्मकार व्यवसाय करणाऱ्या लहान मोठ्या व्यावसायिकांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी मदत होईल . त्याचबरोबर आपण बीड जिल्ह्यातील राखीव असलेल्या केज मतदार संघात विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असून त्यासाठी सर्व चर्मकार बांधवानी विशेषतः मा बबनराव घोलप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वतीने आपणास उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी याप्रसंगी व्यासपीठावरन केली. सांगता समारंभाचा अध्यक्षीय समारोप राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांनी केला. याप्रसंगी त्यांनी राज्यातील सर्व चर्मकार बांधवाना एकत्रित येऊन आपल्या समाजाची एकसंघता दाखवून देण्याचे आवाहन उपस्थित समाज वासीयांना केले. आज चर्मकार समाज हा अतिशय विखुरलेल्या अवस्थेत आहे. आजही आपल्या समाजातील अनेक कुटुंब अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. सध्याच्या काळात फॅशन व झगमगाट सर्वत्र दिसून येत आहे. या झगमगाटाच्या दुनियेत आपला पारंपरिक व्यवसाय करणारे चर्मकार बांधव हे दूर फेकल्या जात आहेत. तेव्हा अशा समाजबांधवना प्रवाहात आणण्यासाठी सर्व समाजबांधवानी एकसंघ होने गरजेचे असल्याचे घोलप यांनी सांगितले. चर्मोद्योग महामंडळाच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगार युवकांनी ज्या ज्या सवलती शासनाने उपलब्ध करुन दिल्या आहेत त्याचाही लाभ घेण्याचे आवाहन याप्रसंगी बबनराव घोलप यांनी केले. या सांगता समारोहत राज्यभरातून चर्मकार समाज बांधव मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

मनोज जरांगेंनी केली राजकोट किल्ल्याची पाहणी

मालवण । प्रतिनिधी

मालवण येथील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. अवघ्या ८ महिन्यांपूर्वी बसवण्यात आलेला हा पुतळा कोसळल्यामुळे राज्यामध्ये संतापाची लाट उसळली. त्यामुळे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. याच पार्श्वभूमीवर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मालवणचा दौरा केला आहे. राजकोट किल्ल्यावर जरांगे पाटील यांनी पाहणी केली. पाटील हे थेट खासदार नारायण राणे यांच्या बालेकिल्ल्यामध्ये दौरा करत आहेत. राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यामुळे विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे सत्र सुरू आहे. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भरसभेमध्ये माफी देखील मागितली. मात्र ही राजकीय माफी असल्याचे म्हणत महाविकास आघाडीने जोडे मारो आंदोलन केले आहे. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी राजकोट किल्ल्याची आणि पुतळ्याची पाहणी केली.

हजारो युवक-युवतींच्या उपस्थितीत नोकरी मेळाव्याचे थाटात उद्घाटन!

बीड । प्रतिनिधी

बीडमधील सुशिक्षित आणि बेरोजगार असलेल्या युवक युवतींसाठी नौकरीची सुवर्णसंधी प्राप्त करून देण्याच्या उदात्त हेतूने बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या वतीने रविवारी नोकरी मेळाव्याचे माँ वैष्णवी पॅलेस बीड येथे आयोजन केले.या कार्यक्रमाचे उद्घाटक माजी मंत्री शिवसेना मराठवाडा संपर्क नेते अर्जुनराव खोतकर होते तर शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बापुसाहेब मोरे , जिल्हा संपर्क प्रमुख पंडित भुतेकर, जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महाराष्ट्र राज्य व्यापारी महासंघाचे महामंत्री संतोष सोहनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंडाळ , बीडीओ सानप , तालुका आरोग्य अधिकारी कासट , जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, महिला आयोगाच्या सदस्या अँड संगीता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. भर पावसात नौकरी मेळाव्यास हजारोंच्या संख्येने बीडमधील युवा वर्गाने हजेरी लावली होती. याबरोबरच शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, महिला आघाडीच्या सदस्या तसेच लोकप्रतिनिधी, शिवसैनिक, पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत नौकरी मेळाव्याचे उद्घाटन थाटात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटक अर्जुनराव खोतकर आणि बापुसाहेब मोरे यांच्यासह सर्व

मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी सर्व मान्यवरांचा बीड शिवसेनेच्या वतीने हृदय करण्यात करून स्वागत करण्यात आले. प्रतिक कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत नौकरी भरती मेळाव्याची माहिती दिली. यानंतर अर्जुनराव खोतकरआणि बापुसाहेब मोरे यांनी युवा वर्गास सक्षम करण्याकरिता बीड शिवसेनेने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक केले. याबरोबरच उपस्थित असलेल्या युवक-युवतींना मार्गदर्शन करत नोकरी भरती मेळाव्यातून स्वतःचा उत्कर्ष साधा, कुटुंबाची जबाबदारी उचलून आयुष्याची वाटचाल समृद्ध करा असे सांगत शुभेच्छा दिल्या. लवकरच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बोलून बीडमधील युवांसाठी मुख्यमंत्री युवा कौशल्य योजनेचा महामेळावा आयोजित करून बीडच्या पन्नास हजार युवक-युवतींना नोकरी देण्याचे प्रयत्न करू असे कार्यक्रमाचे उद्घाटक माजी मंत्री तथा शिवसेना मराठवाडा संपर्क नेते अर्जुनराव खोतकर यांनी अभिवचन दिले. बीडमध्ये पन्नास पेक्षा अधिक राष्ट्रीय- अंतराष्ट्रीय कंपन्या डेरे दाखल झाल्या असून अजूनही नौकरी भरती मेळाव्यात युवक-युवतींचे मुलाखती सुरु आहेत. पात्र उमेदवारास जागेवरच नियुक्तीपत्र देण्यात येत आहे. काही उमेदवारांना अर्जुनराव खोतकर , बाप्पुसाहेब मोरे यांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्र देखील देण्यात आले.

पान १वरून...

मराठवाड्यात

भरली असल्याचे दिसून येत आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार रविवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी मांजरा धरण ४०.५७ टक्के भरले आहे. माजलगाव धरणात अजूनही पाणीसाठा शून्यावरच आहे. इतर धरणांमध्ये हळूहळू वाढ होत आहे. हिंगोलीतील सिद्धेश्वर धरण आज ७८.२९ टक्क्यांनी भरले आहे. मागील वर्षी सिद्धेश्वर धरणामध्ये ४५.९३ टक्के पाणीसाठा होता. तर सर्वाधिक जलक्षमतेच्या येलदरी धरणात ४१.८७ टक्के पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे. मागील वर्षी हा पाणीसाठा ५९.९२ टक्के एवढा होता. अजूनही येलदरीत मागील वर्षाच्या तुलनेत जलतूट नोंदवण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक जलक्षमतेचे निम्नमनार धरण १०० टक्के भरले. मागील वर्षी ५२ टक्क्यांवर असणारे हे धरण पूर्ण भरल्यामुळे नांदेडकरांना दिलासा मिळाला. विष्णुपुरी धरणात ८५.५८ टक्के पाणीसाठा नोंदवण्यात आला. धाराशिवमधील धरणांची परिस्थिती असून सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातून या जिल्ह्याची तहान भागत असल्याने जिल्ह्यात दिलासादायक चित्र आहे. उजनी धरण १०० टक्के भरले असून धाराशिव जिल्ह्यातील निम्न तेरणा ३५.७ टक्के तर सीना-कोळेगाव अजूनही शून्यावर आहे. यंदा लातूर जिल्ह्यात जोरदार पावसाने हजेरी लावल्याने जिल्ह्यातील बहुतांश धरणे ६० ते ८० च्या घरात गेली आहेत. जिल्ह्यातील सर्वाधिक क्षमतेचे शिवनी धरण ७९.२२ टक्क्यांनी भरले असून मागील वर्षी धरणात केवळ ०.६८ टक्के पाणीसाठा होता. खुलगापूर धरणात ८२.५१ टक्के पाणीसाठा झाला आहे. तर परभणी जिल्ह्यातील निम्न दुधना प्रकल्पात २४.१० टक्के पाणीसाठा झाला आहे. सर्वाधिक क्षमतेचे शिवनी धरण ७९.२२ टक्क्यांनी भरले असून मागील वर्षी धरणात केवळ ०.६८ टक्के पाणीसाठा होता. खुलगापूर धरणात ८२.५१ टक्के पाणीसाठा झाला आहे. तर परभणी जिल्ह्यातील निम्न दुधना प्रकल्पात २४.१० टक्के पाणीसाठा झाला आहे.

मालवणमध्ये उभारलेला पुतळा

खा. शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खा. छत्रपती शाहू महाराज, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड, खा. चंद्रकांत हंडोरे, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खा. संजय राऊत, खा. सुप्रिया सुळे, अनिल देशमुख, आदित्य ठाकरे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये असे अनेक पुतळे आहेत पण मालवणच्या भागात उभा केलेला पुतळा हा एक भ्रष्टाचाराचा नमुना होता. त्याच्या उभारणीमध्ये भ्रष्टाचार झाला, असा जनमानसांमध्ये समज आहे आणि हा शिवछत्रपतींचा अपमान आहे. त्याचबरोबर संपूर्ण देशातल्या शिवप्रेमी जनतेचा अपमान आहे. हा अपमान ज्यांनी केला त्यांचा सक्त निषेध करण्यासाठी आजची ही मोहीम असल्याची टीकाही यावेळी महायुती सरकारवर केली. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, मालवणच्या राजकोट किल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा वाऱ्यामुळे पडला असे विधान मुख्यमंत्र्यांनी केले. गेट वे ऑफ इंडियासमोरचा पुतळा अनेक वर्षापासून आहे, राज्यातही अनेक भागात असे पुतळे आजही भक्कमपणे उभे आहेत. महाराजांचा पुतळा कोसळल्याने देशातील शिवप्रेमींचा अपमान झाला असल्याचेही यावेळी ते म्हणाले. यावेळी काँग्रेस खासदार छत्रपती शाहू महाराज म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याने जनता संतप्त झाली आहे. हा महाराजांचा व महाराष्ट्राचा अपमान आहे, ज्यांनी हे केले त्यांना माफी नाही. जे लोक याप्रकरणी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. शिवाजी महाराजांचा मान राखला पाहिजे, त्याप्रमाणे आपली पावले पडली पाहिजेत असेही यावेळी ते म्हणाले.

शिक्षा माफ करण्याची आसाराम

जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. न्यायमूर्ती इला व्होरा आणि न्यायमूर्ती विमल व्यास यांच्या खंडपीठाने आसाराम बापूची शिक्षा रद्द करून जामीन देण्याची मागणी फेटाळली. तसेच या प्रकरणात आरोपी आसाराम बापू याला कुठलाही दिलासा देता येणार नाही, असे सांगितले. २०१३ मधील एका बलात्काराच्या घटनेप्रकरणी जानेवारी २०२३ मध्ये न्यायालयाने आसाराम बापूला दोषी ठरवले होते. आसाराम बापू याने गांधीनगरमधील आश्रमात एका महिलेवर बलात्कार केला होता, असा आरोप होता. त्यानंतर महिलेने दिलेल्या तक्रारीवरून आसाराम बापू याच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली. आसाराम बापू सध्या बलात्कार प्रकरणी जोधपूरमधील तुरुंगात शिक्षा भोगत आहे.

न्याय मिळेपर्यंत, त्यांचे जीवन

महत्त्वही अधोरेखित केले. विशेष म्हणजे कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या नुकत्याच झालेल्या बलात्कार आणि खून प्रकरणाचा निषेध करणाऱ्या त्यांच्या वक्तव्यानंतर राष्ट्रपती मुर्मू यांची देशातील प्रलंबित खटल्यांवर टिप्पणी आली आहे.

क्रॉप इन्शुरन्स ॲपवर नुकसानीची

पुराचा धोका असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन

मागील काही तासांपासून बीड जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील अनेक नाले, ओढे व नदी दुथडी भरून वाहत आहे. दरम्यान बीड शहराजवळील बिंदुसरा प्रकल्पाचे तळे पूर्णपणे भरले असून पुढील काही तास पावसाचा जोर असाच राहील्यास नदीने धोकादायक पातळी ओलांडल्यास नदीकाठच्या नागरिकांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी सतर्क व सावध रहावे तसेच काहीही अडचण आल्यास आपत्कालीन विभाग ०२४४२-२९९२९९ व आ.क्षीरसागर यांचे स्वीय सहायक गणेश भरनाळे, संदीप नवले, अशोक चौरे यांच्या मो.नं.७७९८९७३१९९, ९७६६२७२७२४, ८१४९७७५७७७ या संपर्क क्रमांकावर तातडीने संपर्क करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

तांत्रिक अडचणींबाबत प्रशासनाने काळजी घ्यावी

बर्याच वेळा पीक पाहणी, नुकसानीची नोंदणी करताना संबंधित पोर्टल तसेच ॲपवर सर्वर डाउन तसेच इतर तांत्रिक अडचणी शेतकरी बांधवांना येत असतात. नुकसानीची माहीती देण्याचा कालावधी हा ७२ तासांचा आहे. या अनुषंगाने प्रशासनाने विमा कंपनी व संबंधित कार्यान्वित पोर्टल कंपनी यांच्याकडे समन्वय साधून तत्सम प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत. याची काळजी घेण्याच्या सुचना आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

निवडणुकीच्या तोंडावर शेतकरी प्रदर्शन

सत्य सत्यच असते, सत्याचा विजय होत असतो असे ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, लोकसंख्येच्या तुलनेत आज प्रत्येक व्यक्तीला सरासरी दोन ते तीन एकर जमिन मिळू शकते, भविष्यात ही परिस्थिती गुंठ्यांवर येईल त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून ज्ञान आत्मसात करीत शेती पुरक उद्योग उभारावेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर, कृषी महाविद्यालय आष्टी यांच्या वतीने व शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शनाचा गहिनीनाथ गडाचे मठाधिपती हभप विठ्ठल महाराज शास्त्री व अखिल भारतीय वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप प्रकाश महाराज बोधले यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी समारोप झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोजक माजी आमदार भीमराव धोंडे हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजय धोंडे, चेअरमन राजेश धोंडे,अभयराजे धोंडे,विठ्ठल बनसोडे, जिल्हा कृषी अधिकारी बाबासाहेब जेजूरकर, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, जेष्ठ संपादक प्रा. अनंतराव हंबर्डे, ह.भ.प. दिनकर तांदळे महाराज, रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, संजय कांकरिया, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, भाऊसाहेब सायबर, दिलीपराव काळे,बाजीराव वाल्हेकर, बाजार समितीचे संचालक आण्णासाहेब लांबडे,माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे, व इतर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुढे बोलताना हभप प्रकाश महाराज बोधले यांनी सांगितले की, सरकारी योजना कशा राबवाव्यात हे विठ्ठल महाराजांकडून शिकावे. कृषी क्षेत्रात स्वामिनाथन यांचे नांव लौकिक आहे. कृषी प्रदर्शन पाहून शेतकऱ्यांची भावना बदलून अनेकांना कृषी पुरक व्यवसाय करण्यासाठी मत परिवर्तन होईल. खेळ पैठणीच्या कार्यक्रमाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, प्रत्येकाने एकदा तरी आपल्या सौभाग्यवतीला पैठणी घ्यावी. सर्वसामान्य लोकांना रोख स्वरूपात मदत नको तर शिक्षणाच्या माध्यमातून भिमराव धोंडे मदत करतात. त्यांनी शिक्षणासोबत नाळ जोडलेली आहे. युवा नेते अजय धोंडे यांच्या विषयी बोलताना बोधले महाराज म्हणाले की, ते होतकरू युवा नेते आहेत त्यांना धोंडे हे नांव कायम पुढे न्यायचे आहे. भविष्यात तुम्ही यशस्वी व्हाल असे आशिर्वाद दिले. अध्यक्षपदावरुन बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राची ओळख निर्माण झालेली आहे. साधु संतांनी देखील शेतीचे महत्व सांगितले आहे. शेतीवर प्रकाश टाकण्यासाठी कायमच वारकरी संप्रदायाने काम केले डॉ. स्वामीनाथन यांच्या कृषी क्षेत्रातील कामामुळे त्यांची जगभरात ख्याती आहे. त्यांनी जादा उत्पादन देणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या पिकाच्या जातीचे संशोधन केले. भारताचे पंतप्रधान मोदी यांनी देखील एक हजार शास्त्रज्ञांना कामाला लावून असे संशोधन करा की ज्यातून कमी पाण्यावर,कमी कालावधीत ज्यादा उत्पन्न कसे मिळेल यासाठी काम करावे. पुढील दहा वर्षात सर्वच पिकांची उत्पादन क्षमता वाढलेली दिसेल असे बियाणे भविष्यात येईल. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतीपूरक व्यवसाय शेतकऱ्यांनी उभारावेत. महाराष्ट्राच्या अनेक भागातून कृषी प्रदर्शनासाठी स्टॉल आले होते. राज्यातील सर्वात मोठा सांगली येथील खिल्लार जातीचा बैल देखील आला होता. हजारो विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली या भावी पिढीला प्रदर्शनाचा भविष्यात निश्चित फायदा होईल. आपला मतदारसंघ हा ऊस तोडणी कामगारांचा आहे. मला नेहमी वाटते की आपल्या भागातील लोकांची ऊस तोडणी पासून मुक्तता होऊन त्यांचे भविष्य चांगले झाले पाहिजे. यासाठी मी नेहमी प्रयत्न करतो. शिक्षण क्षेत्रात थोडेफार काम केलेले आहे. भविष्यात आणखी करायचे आहे आणि ऊसतोड कामगारांचे जीवन बदलण्यासाठी मी सतत प्रयत्न करीत राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हभप विठ्ठल महाराज शास्त्री यांनी सांगितले की, डॉ. स्वामीनाथन यांचे देशातील शेतकऱ्यांसाठी मोठे योगदान आहे. त्यांनी जादा उत्पन्न देणारे विविध पिकांचे वाण शोधून काढले. मा आ भिमराव धोंडे यांनी गहिनीनाथ गडाच्या दिंडीला सुरुवातीला श्री क्षेत्र अरण येथे दोन हजार रुपये दिले होते, त्यानंतरच्या वर्षी केळीचा नाष्टा दिला आणि त्यानंतरच्या वर्षांपासून ते गहिनीनाथ गडाच्या दिंडीतील लाखों वारकऱ्यांना जेवण देतात. त्यामुळे भिमराव धोंडे यांना गहिनीनाथ महाराज व वामन भाऊ यांचे आशिर्वाद आहेत. शेतकऱ्यांसाठी दिल्ली पर्यंत पायी गेले. कृषी प्रदर्शनाची सर्वत्र चर्चा झाली आहे.आपण हे मोठे कार्य केले आहे याचे फळ निश्चित मिळेल. सत्य सत्यच असते, सत्याचा विजय होत असतो. यावेळी स्वागताध्यक्ष व अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, आपला भाग दुष्काळी आहे, यंदा चांगला पाऊस झाला आहे. प्रदर्शनाच्या निमित्ताने निसर्गाने चांगली साथ दिली. महिलांसाठी आयोजित खेळ पैठणीच्या कार्यक्रमास तीन हजारांवर महिलांनी हजेरी लावली. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी धोंडे साहेब विधानसभा निवडणुक लढविणार आहेत त्यासाठी आपण सर्वांनी पाठीमागं उभे राहण्याची गरज आहे. प्रा. अनंतराव हंबर्डे यांनी सांगितले की,मा आ भिमराव धोंडे यांच्या श्वासात शेतकरी आणि शेतकरीच आहेत. सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन चालतात. डॉ. स्वामिनाथन यांनी देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. भिमराव धोंडे यांच्या शेतकरी संस्थेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत. शेतकरी कधीच बेइमानी करीत नाहीत. मी पहिल्या निवडणुकीपासुन त्यांच्या सोबत आहे आणि उद्याही मी त्यांच्या सोबत राहणार आहे. त्यांच्या हातून एकदा चुक झाली आहे, त्यातून शिकायचे असते असेही सांगितले.पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की, माजी आमदार भीमराव धोंडे यांचा स्वभाव सरळ आणि शांत आहे. काही लोक त्यांच्या शांत स्वभावाचा फायदा घेतात. हा स्वभाव आता बदलावा आणि भविष्यात काहींची चांगलीच जिरवा असे सांगितले.तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी सांगितले की, कृषी प्रदर्शनामुळे मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडली. त्यांना नवनवीन माहिती मिळाली. यातून शेतकरी समृद्ध होण्यासाठी मदत होईल माजी आमदार भीमराव धोंडे यांनी प्रत्येक वर्षी अशाच प्रकारे चांगल्या प्रकारचे कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात यावे. रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी भिमराव धोंडे यांचा भावी आमदार असा उल्लेख केला. यावेळी कु. भक्ती गिरी या विद्यार्थ्यांनीने देखील उत्कृष्ट भाषण केले. कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख, डॉ . विश्वास मुळे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस,, ग्रा. पं. सदस्य आदेश निमोनकर, युवा न

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २ सप्टेंबर २०२४

रक्ताटे परिवार तर्फे श्री मत्स्योदरी देवी संस्थानला ५१ हजारची देणगी

अंबड । प्रतिनिधी

१ सप्टेंबर रोजी श्री मत्स्योदरी देवी संस्थान, अंबडला वडीकाळा येथील श्री लक्ष्मण आसाराम रक्ताटे आणि सौ कौशल्याबाई लक्ष्मण रक्ताटे यांनी संस्थान परिसरात चालू असलेल्या बांधकामासाठी ५१००० (एक्कावन हजार रुपय) निधी देणगी स्वरूपात दिला आहे. यावेळी संस्था पुजारी , विश्वस्त श्री गीता विलास कुंटेफळकर , संस्थान व्यवस्थापक श्री कैलास शिंदे यांनी त्यांना देवीचा फोटो , शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी रक्ताटे परिवारातील सौ लक्ष्मी अरुण रक्ताटे ,आकाश अरुण पाटील, रुद्रराज अरुण रक्ताटे, ईश्वर भरत रक्ताटे व संस्थान कर्मचारी नामदेव राठोड, अर्जुन शिंदे आणि गोविंद कायस्थ उपस्थित होते.

माझी शेती माझा सातबारा , मीच नोंदवणार माझा पीक पेरा

बीड । प्रतिनिधी

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली नागापूर बुद्रुक व नागापूर खुर्द येथे शासनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प ई पीक पाहणी बाबत तलाठी काजल ससाणे यांनी मार्गदर्शन केले . ई पीक पाहणी केल्याशिवाय शासनाचे कोणतेही अनुदान विमा मिळणार नाही , याबाबत सर्व शेतकऱ्यांना कल्पना दिली . ई पीक पाहणी करण्यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन तलाठी कार्यालया मार्फत व मंडळ अधिकारी वंदना विघ्ने यांच्यामार्फत करण्यात येईल असे सर्व शेतकऱ्यांना सांगितले .यावेळी शेतकऱ्यांनी माझा पिक पेरा मीच नोंदवणार असा संकल्प केला.

शासनाच्या महत्त्वाकांक्षी ई पीक पाहणी प्रकल्पाची जनजागृती करावी , शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवाव्या असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचे निर्देश आहेत . निवासी उपजिल्हाधिकारी

शिवकुमार स्वामी यांनी वेळोवेळी सर्व तहसीलदार आणि अधिनस्त मंडळ अधिकारी , तलाठी यांना तशा सूचना केल्या आहेत. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी ८ ऑगस्ट रोजी तहसीलदार बीड या पदाचा पदभार घेतला . त्यांनी लागलीच मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी बैठक घेऊन सर्वांना सुचित केले होते की प्रत्येक मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी गावागावांना भेटी दिल्या पाहिजे , शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजे , त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. त्यानुसार आजच्या भेटीत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करावी असे आवाहन तलाठी काजल ससाणे यांनी केले . ई पीक पाहणी १५ सप्टेंबर पर्यंत करता येणार आहे . त्याच बरोबर त्यांनी पी एम किसान व संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना , शेती विषयक अनुदान , पोळा उत्सव शांतता आवाहन , लाडकी बहीण योजना याबद्दल माहिती दिली . काही तांत्रिक अडचणी आल्यास त्यांचे निराकरण केले जाईल असेही त्यांनी सांगितले . तसेच तलाठी काजल ससाणे यांनी मौजे नागापूर बुद्रुक व नागापूर खुर्द येथील नवीन मतदान यादीतील नवीन जुने नावे तपासली व मतदान यादी प्रसिद्ध करण्यात आली .

तलाठी काजल ससाणे यांनी सर्व प्रथम मौजे नागापूर बुद्रुक येथे भेट दिली ; या कार्यक्रमास नागापूर बुद्रुक गावचे सरपंच किशोर ढोकणे , सर्व ग्रामपंचायत सदस्य , सेवा सहकारी सोसायटीचे दुधाराम बाप्पा चव्हाण , प्रतिष्ठित नागरिक बाजीराव खराडे , महादेव परस्कर , महादेव काळे , कैलास लांडे , अंगद शिंगण , सीताराम कारगुडे , हनुमान चव्हाण , मनीषा शिंदे , संजीवनी चव्हाण , मधुकर खराडे , तुकाराम ढोकणे , नेमू चव्हाण , महादेव कदम , सुदर्शन देवगुडे , मीरा कुटे , कानिफनाथ खराडे , बाबूराव कदम , चंद्रकांत कंधारे , बाळू कंधारे , भरत साळुंखे आदी गावातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. त्या नंतर त्यांनी नागापूर खुर्द येथे भेट दिली . तेथेही वरील सर्व योजनांची माहिती दिली . ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या . या कार्यक्रमास नागापूर खुर्द गावचे सरपंच सुमेधा साळुंके , चेअरमन नारायण साळुंके , व्हॉईस चेअरमन खाजा सलीम पठाण , जिल्हा परिषद मुख्याध्यापक शेख नविद , जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक सुमन जोगदंड , आयोध्या आंधळे , अलका गेटे , प्रतिमा छत्रबंद , प्रज्ञा उजगरे , अजित मुळूक , सखाराम साळुंके , प्रतिष्ठित नागरिक धर्मराज साळुंके , प्रदीप साळुंके , ज्ञानेश्वर लवळे , साजेद पठाण , गोकुळ साळुंकेव गावातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या रस्ते विषयक समस्या , अनुदान विषयक समस्या , स्वस्त धान्य वाटपा बाबत तक्रारी , ई– पीक पाहणी बाबत अडचणी याबाबत मी स्वतः लक्ष ठेवून आहे . तालुक्यातील शेतकऱ्यांनी सरळ माझ्याशी अथवा नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी यांच्याशी संपर्क साधावा : तहसीलदार चंद्रकांत शेळके.

नागापूर ग्रामस्थांचा संकल्प

वैयक्तीक सांडपाणी व्यवस्थापन करणाऱ्या कुटूंबाचा गांधी जयंतीदिनी होणार सन्मान

बीड । प्रतिनिधी

जिल्हयातील १३५० गावांमध्ये वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापन करीता शोषखड्डा किंवा परसबाग किंवा पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापन साठी कंपोस्ट खत खड्डा अथवा घरगुती खत खड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंडी या बाबींची प्रभावीपणे वापर करणाऱ्या कुटुंबांचा येत्या २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती निमित्ताने प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर सत्कार होणार आहे. स्वच्छतेची सवय अंगीकृत करण्यासाठी लोक चळवळ उभी करण्याच्या उद्देशाने जिल्हयामध्ये ''स्वच्छ माझे अंगण'' अभियान सर्वांनी मिळून राबवा,असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगितादेवी पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यात पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच ग्रामपंचायत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वैयक्तिक शौचालय, घनकचरा , सांडपाणी व्यवस्थापन उपक्रमात समाविष्ट असलेल्या असलेल्या सर्व गावांमध्ये स्वच्छतेच्या बाबींची सवय आत्मसात करण्यासाठी व इतर कुटुंबांना प्रोत्साहन मिळावे याकरिता ज्या कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय आहे, सांडपाणी व्यवस्थापनकरिता शोषखड्डा किंवा परसबाग किंवा पाझरखड्डा आहे , घनकचरा व्यवस्थापनाकरिता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि स्वच्छतेचे दोन रंग हिरवा आणि निळ्या रंगाची कचराकुंडी असून चारही घटकांचा नियमितपणे वापर करतात अशा कुटुंबाची निवड करून ग्रामपंचायत स्तरावर त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

माझे स्वच्छ अंगण अभियान राबविणेकरीता ग्रामपंचायत

स्तरावर अभियानाची माहिती व सूचना सर्व ग्रामस्थांना होण्याकरिता गावात दवंडी देणे, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, सोसायटी कार्यालय, तलाठी सज्जा या ठिकाणच्या सूचना फलकावर माहिती दि.२९.०८.२०२४ ते दि.३१.०८.२०२४. या कालावधीत लावण्यात आली आहे .

अभियान अंमलबजावणी कालावधीचे दोन टप्पे करण्यात आले असून पहिला टप्पा ०१.०९.२०२४ ते दि.२५.०९.२०२४ या कालावधीत चार सुविधा असलेल्या सर्व कुटुंबांची माहिती घेण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पडताळणी समितीच्या मदतीने दि. २६.०९.२०२४ ते दि.३०.०९.२०२४ या कालावधीत गृहभेटी देऊन पडताळणी करण्यात येणार आहे. ज्या कुटुंबाकडे या सुविधा असून त्यांचा वापर होत आहे असे कुटुंब सन्मानासाठी पात्र होणार आहे.पात्र झालेल्या कुटुंबांना ग्रामपंचायतीच्या वतीने सन्मानाचे निमंत्रण एक ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे दिले जाणार आहे

तर दोन ऑक्टोबर रोजी प्रत्यक्ष उपस्थित कुटुंबांचा सन्मान ग्रामपंचायतीच्या वतीने केला जाणार आहे

सन्मानासाठी निवड झालेल्या कुटुंबांकडे घरात किंवा परिसरात स्वच्छते समितीच्या चार सुविधा असणे त्याचा नियमित वापर होणे आवश्यक आहे.

घरगुती खतखड्डा / परसबाग
वैयक्तिक शोषखड्डा/पाझरखड्डा
वैयक्तिक शौचालय

कचरा वर्गीकरणाच्या दोन कुंड्या असणाऱ्या कुटुंबांची निवड करण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालयातील पाणी व स्वच्छता समिती मार्फत दि.२६.०९.२०२४ ते दि.३०.०९.२०२४ पर्यंत पाच दिवसात पडताळणी होणार आहे. निकषाच्या आधारे निवड केलेल्या कुटुंबांची यादी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावी. त्याचबरोबर संबंधित कुटुंब अभियानात पात्र झाले असल्याबाबत लेखी स्वरुपात कळवून त्यांना कार्यक्रमाकरीता निमंत्रित करण्यात यावे,उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना दिनांक २ ऑक्टोबर रोजीच्या कार्यक्रमात सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करावे अशा सूचना सर्व ग्रामपंचायतींना दिला असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी दिली आहे.

पान ६ वरून...

थोडया थोडक्या पावसामुळे

प्रमाणात वाढले आहे अशा वेळी समाधानकारक पावसाच्या अपेक्षा असताना पावसाने दडी मारली आणि ही पिके धोक्यात सापडले पिवळी पडू लागली सुदैवाने गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात पावसाच्या बातम्या येत होत्या त्या खऱ्या ठरल्या उशिरा का होईना पावसाला सुरुवात झाली आणि त्यामुळे सुकून गेलेल्या पिकांना जीवदान मिळत आहे चांगला पाऊस पडल्याची नोंद झाली आहेपुढील काळात देखील मुसळधार पाऊस पडणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे भारतीय हवामान खात्याने शेतकऱ्यासाठी आनंदाची बातमी दिली असून मराठवाडयातही मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

शक्तीपीठ महामार्गाची अधिसूचना

राष्ट्रीय महामार्गावरील राजकीय जाहिरात बॅनर फलक लावण्यावर बंदी करा . शक्तिपीठ महामार्ग भूसंपादन बाबतची अधिनियम १९५५ नुसार सक्तीच्या भूसंपादनाची जाहीर केलेली अधिसूचना रद्दच करावी.

शक्तिपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांच्या बरोबर कसलीच चर्चा न करता, त्यांच्या सहमती शिवाय भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करू नये. या मागण्यासाठी मोहन गुंड यांनी पाच दिवस अन्नत्याग आंदोलन केले होते. या वेळी महामार्ग बाधीत शेतकरी आघाडीचे राज्य अध्यक्ष भाई दिगंबर कांबळे, राज्य संपर्क प्रमुख शरद पवार , गजानन पाटील, ॲड निखिल बचुटे हरिश्चंद्र मुंडे, व्यंकट ढाकणे , आवेज सय्यद, नवनाथ जाधव ,विलास देशमुख, शत्रुघ्न तपसे , अशोक रोडे, महेश गायकवाड, अजित पौळ, उमेश लाड, मंगेश देशमुख, कल्याण मुंडे, गणेश गोरे, माणिक मुंडे, भानुदास मुंडे, मुक्तराम गवळी , अशोक साखरे, नरसिंग आघाव, दिगंबर तपसे व मोठ्या संख्येने शक्तिपीठ महामार्ग बाधीत शेतकरी सहभागी झाले होते. जिल्हाअधिकारी , उपविभागीय अधिकारी, यांच्या लेखी आश्वासना नंतर. माजी पृथ्वीराज साठे, कृषी उ. बा. सभापती राजेश्वोर आंबा चव्हाण. कॉ काशिनाथ कापसे सर ,कालीदास आपेट, अचित गंगणे यांच्या मध्यस्थीने भाई मोहन गुंड यांना नारळ पाणी देऊन स्थगित करण्यात आले.

तुंबलेल्या नाल्यातील पाणी रस्त्यावर

मंगळवार पेठ परिसरातील घाण पाण्याच्या प्रश्नावर मूग गिळून गप्प बसल्याचे दिसून येत आहे. यावरून या परिसरातील एखाद्या नागरीकांचा जीव जाण्याची तर वाट पाहात नाही ना ? या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा कोणी वली आहे का नाही असे संतप्त सवाल येथील नागरिक करत आहेत.

अंबाजोगाई नगर परिषद प्रशासनाने वेळीच या नाल्याच्या प्रश्नावर लक्ष घालून तुंबलेल्या नाल्यातील घाण पाण्याला वाट करून दिली नाही तर या मंगळवार पेठ परिसरात मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरून येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येईल अशी भावना येथील नागरिकांनी व्यक्त केली आहे. अर्ध्या अंबाजोगाई शहरातील घाण पाणी येत असलेल्या या अतीशय जुन्या असलेल्या नाल्यावरील झालेली अतिक्रमण तात्काळ दूर करून नाला दुरुस्त करून त्यातील पाण्याला मोकळी वाट करून दयावी व पुढोल धोका टाळावा अशी मागणी मंगळवार पेठ परिसरातील नागरिकांतून केल्या जात आहे. याच मागणीसाठी येथील नागरिक नगर परिषद अंबाजोगाई येथे उग्र आंदोलन करण्यास मागे पुढे पाहणार नाही त अशीही संतप्त प्रतिक्रिया या परिसरातून व्यक्त होत आहे.

श्रद्धा,शील,दान व प्रज्ञेशिवाय

केले. यावेळी पू.भिक्खू धम्मशील थेरो हे उपासकाचे चार सद्? गुण या विषयावर बोलत होते.यावेळी रणजीत घनघाव व अनुपमा रणजीत घनघाव यांनी खिरदान दिले.यावेळी प्रस्ताविक सद्धम्म सेवा संघाचे जी एन घनघाव यांनी केले तर, सूत्रसंचालन ॲड.दशरथ मकसरे, यांनी केले.तर आभार सदाशिव भालेराव यांनी मानले.यावेळी संस्थेचे पांडुरंग जाधव, एन.जी.शिनगारे, सोपानराव उजगरे, भगवानराव सातपुते, रविकांत उघडे, लिलाबाई उजगरे, धम्मपाल जावळे,विजय होळकट्टी हे उपस्थित होते. हिंगोली येथील शकुंतलाताई भूक्तार, पार्वतीताई श्रीखंडे, माजी प.स.सभापती संजीवनी पौळ, प्रकाश सोनकांबळे,भारत घनगाव, प्रतिभा वाघमारे,बन्सी शिरसट,तात्यासाहेब साळवे, वंदनाताई भालेराव,नितीन डोंगरे आदी. उपासक उपस्थित होते.

जेपीसी बँकेच्या प्रभारी अध्यक्षपदी संजय भरतीया

जालना । प्रतिनिधी

दि जालना पिपल्स को– ऑप बँकेच्या प्रभारी अध्यक्षपदी दैनिक कृष्णनितीचे संपादक संजय कैलासचंद्र भरतीया यांची निवड करण्यात आली आहे. विद्यमान अध्यक्ष संजय मुथा हे रजेवर गेले असल्यामुळे त्यांच्या अध्यक्षपदाचा प्रभारी पद्भार संजय भरतीया यांना देण्यात आला आहे. यावेळी अध्यक्ष संजय मुथा, जेष्ठ संचालक सतिश पंच, राजकुमार दायमा, किशोर देविदान उपस्थित होते.

स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार ख्यातनाम नाटककार, नट, दिग्दर्शक पद्मश्री सतीश आळेकर यांना जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचा स्व. भगवानरावजी लोमटे स्मृती राज्य पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, पटकथा लेखक, पुणे यांना घोषित करण्यात आला आहे. समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने समाजकारण, साहित्य, संगीत, सांस्कृतिक, सहकार, शिक्षण, नाटक, सिनेमा आदी क्षेत्रात उतुंग कार्य केलेल्या एका मान्यवरास स्व. भगवानरावजी लोमटे यांच्या स्मृतिपित्यर्थ दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी हा बारावा पुरस्कार संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त पद्मश्री सतीश आळेकर, पुणे यांना दिला जाणार आहे. सतीश आळेकर हे गेली पन्नास वर्षपेक्षा आधिक काळ नाटककार म्हणून सर्वदूर परिचित आहेत. त्याच बरोबर सिनेमा पटकथा लेखन त्यांनी केलेलं आहे. नाटक व सिनेमात त्यांनी अभिनयाबरोबरच उत्तम दिग्दर्शक म्हणून त्यांचे कार्य रसिकांच्या मनामनात आहे. जीवरसायन शास्त्रात त्यांनी पदवी प्राप्त केली आणि अगदी तारुण्याच्या उंबरठ्यावर ते नाटक लिहिणे आणि नाट्य चळवळ गतिमान करण्यात यशस्वी झाले. त्यांची मिकी आणि मेमसहेब, महानिर्वाण, महापूर, बेगम बर्वे, शनवार रविवार, पिढीजात आदी नाटके प्रसिद्ध व लोकाभिमुख झाली. झुलता पूल, सामना आदी एकांकिका या सर्वोत्तम लोकप्रिय झाल्या होत्या. जैत रे जैत या मराठी सिनेमाचे पटकथा लेखन त्यांनी केले. अनेक नाटकाचे दिग्दर्शन व अभिनय पण त्यांनी केले आहे. यशवंतराव चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आक्रित, उंबरठा आदी चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या.

अंबाजोगाई येथे त्यांच्या अनेक नाटकांचे प्रयोग झाले होते.

त्यांना या कार्यासाठी राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संगीत नाटक अकादमी पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. महाराष्ट्र शासनाचे अनेक नामांकित पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यात प्रभाकर पणशीकर जीवन गौरव पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या नाट्य व सिने क्षेत्रातील हे कार्य पाहता या कार्याची दखल घेवून हा पुरस्कार त्यांना न्या.अंबादास जोशी, माजी न्यायमूर्ती हायकोर्ट व लोकायुक्त गोवा राज्य यांच्या हस्ते व नाट्य कलावंत चंद्रकांत काळे यांच्या विशेष उपस्थितीत देण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पहार, रोख पंचवीस हजार रुपये असे आहे. यापूर्वी हा पुरस्कार, यशवंतराव गडाख – पाटील, विजय कुवळेकर, पद्मश्री ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, पं. नाथराव नेरळकर, विजय कोलते, मधुकर भावे, उल्हास दादा पवार, प्राचार्य रा. रं. बोराडे व पद्मश्री डॉ. यु. म. पठाण व प्रा. भास्कर चंदनशिव यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. या वर्षीचा बारावा पुरस्कार सतीश आळेकर यांना शनीवार दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी अंबाजोगाई येथे प्रदान करण्यात येईल. अशीही माहिती दगडू लोमटे यांनी दिली आहे.

ऊसतोड कामगारांच्या मुलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा –संजयभाऊ आंधळे

वडवणी प्रतिनिधी

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण बीड यांच्या वतीने वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४ रोजी दप्तर मुक्त शाळेच्या अनुषंगाने तालुकास्तरीय मेळावा संपन्न झाला.

या बाबत सविस्तर माहिती अशी की,वंचित,शोषित,पीडित व ऊसतोड कामगारांच्या मुलं शिक्षणापासून वंचित राहू नये त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून इतर मागास बहुजन कल्याण विभागातील शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये

तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे तर मुख्य अतिथी व मार्गदर्शक म्हणून बीड येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे निरीक्षक लक्ष्मणजी बारगजे तसेच वडवणी नगरपंचायतचे मा.नगरसेवक सतीश बप्पा बडे,थापडे सर,अजय राठोड,अनिल कोलंगडे,श्रीकृष्ण मुने,दहे सर,शेंडगे सर,विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के ए.आर.,पर्यवेक्षक धाईतिडक सर आदिजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व छत्रपती राजर्षी शाहू महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मान्यवर व उपस्थितांचे कु.वैष्णवी यादव व कु.आकांक्षा गावडे या विद्यार्थिनींनी स्वागत गीत गाऊन स्वागत केले.

या कार्यक्रमांमध्ये थापडे सर यांनी शासनाच्या योजनेबद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक लक्ष्मणजी बारगजे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागातील शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देऊन इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा नेते संजयभाऊ आंधळे यांनी अध्यक्षीय समारोप पर विचार व्यक्त करताना म्हणाले की,इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे निरीक्षक लक्ष्मणजी बारगजे सर यांनी सविस्तर शासनाच्या योजनेची माहिती दिल्याबद्दल त्यांच्या आभार मानले वंचित,शोषित,पीडित व ऊसतोड कामगारांच्या मुलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपल्या वडिलांच्या हातातील कोयत खाली ठेवावे असे मत त्यांनी व्यक्त केले.

अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी –बोराडे

मंठा । प्रतिनिधी

मंठा – परतूर तालुक्यासह नेर सेवली भागात रविवार १ सप्टेंबरच्या सकाळपासून अतिवृष्टी सुरू आहे. या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए.जे.बोराडे यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी संदर्भात जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी जिल्हाधिकारी जालना यांना तात्काळ संपर्क करून ही मागणी केली आहे. रात्रीपासूनच अतिवृष्टी सुरू आहे. या भागात पावसाने थैमान घातले आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कापूस, सोयाबीन, तूर आदी पिकांसह

फळबागाचेही नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या अतिवृष्टीमुळे हिरावून घेतला आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ शासनाने पंचनामे करून आपला अहवाल शासनाकडे पाठवावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी केली आहे.

उसापासून इथेनॉल निर्मितीवर घालण्यात आलेली बंदी उठवली !

साखर कारखाने आणि उस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

पुणे : केंद्र सरकारने उसापासून इथेनॉल निर्मितीवर घालण्यात आलेली बंदी उठवली आहे. गेल्या वर्षी दुष्काळामुळे उसाच्या उत्पादनात घट येणार होती. गेल्यावर्षी देशातील संभाव्य साखर संकट टाळण्यासाठी उसाचा रस आणि साखरेच्या अर्कापासून इथेनॉल निर्मिती करण्यावर केंद्र सरकारने बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आता ही बंदी उठवल्यामुळे साखर कारखान्यांना आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला आहे.

साखर उत्पादन कमी होऊ नये म्हणून केंद्र सरकारतर्फे इथेनॉल बंदीचा निर्णय घेण्यात आलेला होता. पण, या निर्णयाचा मोठा फटका कारखान्यांनाचं बसला अन त्यांचे खेळत भांडवल कमी झाले होते. साहजिकच याचा फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सुद्धा बसला होता. दोन वर्षांपूर्वी तर राज्यात अतिरिक्त उसाचा प्रश्न देखील निर्माण झाला होता. मात्र तदनंतर राज्यातील साखर कारखान्यांनी ऊस गाळप क्षमता वाढवली. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. पण गेल्या वर्षी दुष्काळामुळे उसाच्या उत्पादनात घट येणार होती. देशातील संभाव्य साखरसंकट टाळण्यासाठी ऊसाचा

रस आणि साखरेच्या अर्कापासून इथेनॉल निर्मिती करण्यावर केंद्र सरकारने बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता.

उसाच्या वर याचा परिणाम झाला होता. त्यामुळे कारखानदारांसोबतच ऊस उत्पादक अडचणीत आलेत. जे कारखाने इथेनॉलची निर्मिती करायचे अशा कारखान्यांना कर्जही दिले जाऊ नये असा निर्णय राज्य सहकारी बँकांनी घेतला. पण आता इथेनॉल निर्मितीवर घालण्यात आलेली बंदी उठवली गेली आहे. आता साखर कारखान्यांना मोलैसीस, उसाचा रस आणि सिरप पासून पूर्ण क्षमतेने इथेनॉल निर्मिती करता येणार आहे. त्यामुळे अडचणीत आलेल्या साखर कारखानदारांसाठी अन शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे.

०००

नऊ महिन्यांनंतर उठविली बंदी...

डिसेंबर २०२३ मध्ये इथेनॉल निर्मितीवर बंदी आणली गेली होती. पण आता जवळपास नऊ महिन्यांनंतर ही बंदी उठवण्यात आली आहे. राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाने ही बंदी उठवली पाहिजे अशी मागणी लावून धरली होती. साखर महासंघाच्या प्रयत्नांना आता यश आले आहे असून महाराष्ट्रातील ११२ कारखान्यांमध्ये सध्या स्थितीला इथेनॉल निर्मिती केली जात आहे. २०२५ पर्यंत पेट्रोलमध्ये २०% इथेनॉल मिश्रण करण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे. यामुळे आगामी काळात पेट्रोलच्या किमतीही कमी होण्याची शक्यता आहे. म्हणजे सर्वसामान्यांना सुद्धा भविष्यात या निर्णयाचा फायदा मिळणार आहे.

ज्वारी पिकाच्या उत्पादनवाढीची सुत्रे

ज्वारी हे पीक सगळीकडेच घेतली जाते. मात्र तिची लागवड करताना, व्यवस्थीत काळजी घेतली तर भरघोस उत्पादन मिळले. यासाठी योग्य वाणाची निवड आणि तिचे चांगले व्यवस्थापन करणे आवश्यक असते. परभणी मोती, अकोला क्रांती, फुले वसुधा, फुले चित्रा, परभणी ज्योती, फुले रेवती आणि फुले सुचित्रा या पैकी योग्य वाण निवडता येऊ शकतात.

मूलस्थानी जलसंधारणासाठी : पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी पेरणीपूर्वी १० ते १५ दिवस आधी जमिनीत सऱ्या किंवा वाफे करून घ्यावेत. म्हणजे पावसाचे पाणी त्यात साठून ज्वारीसाठी ओलावा साठवला जाईल.

पेरणीचे अंतर : दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी (१८ इंच) तर दोन झाडातील अंतर १० ते १२ सेंमी ठेवणे गरजेचे. हेक्टरी १० किलो प्रमाणित बियाणे पेरावे.

बीजप्रक्रियाः कणसावरील काणी रोगाच्या प्रतिबंधासाठी पेरणीपूर्वी बियाणास गंधक (३०० मेष पोत) ४ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात प्रक्रिया करावी. खोडमाशीच्या प्रतिबंधासाठी, थायामेथोक्झाम (७० डब्ल्यूएस) २.५ ग्रॅम प्रति किलो प्रक्रिया करावी.

रासायनिक खताचा वापर : पेरणी करताना कोरडवाहू ज्वारीला हेक्टरी ४० किलो नत्र, स्फुरद २० किलो जमिनीत १२ सेंमी खोलीवर पेरून द्यावे. यामुळे उत्पादनात ३० ते ३५ टक्के वाढ होते. ओलितासाठी ८० किलो नत्र + ४० किलो स्फुरद +४० किलो पालाश प्रती हेक्टरी द्यावे. त्यामधील अर्धे नत्र आणि पूर्ण स्फुरद व पालाश पेरणीबरोबर आणि अर्धे नत्र पीक ३५ ते ४० दिवसांचे असताना पाणी पाळीबरोबर द्यावे. ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करून संवेदनशील अवस्थेत पाणी दिल्यास उत्पादनात चांगली वाढ होते.

आंतरमशागतीद्वारे ओलावा साठवणूक : रुंद (४५ सेंमी) अंतरावर ज्वारीची पेरणी केल्यास पिकामध्ये कोळप्याच्या मदतीने दोन वेळेस आंतरमशागत करता येते. त्यामुळे निंदणी खर्चात बचत होते. तसेच मातीची धूप आणि पाण्याचा ऱ्हास रोखला जातो.

बहुगुणी औषधी वनस्पती माईनमुळा

उपयुक्त औषधी वनस्पती म्हणून जिचा वापर वेगवेगळ्या आजारावर केला जातो. या अतिशय उपयुक्त वनस्पतीचे नाव आहे 'माईनमुळा'. या वनस्पतीला संस्कृत मध्ये पाषाणभेद, हिंदीत पत्थरचूर या नावाने सुद्धा ओळखतात. या वनस्पतीच्या मुळांना बाजारात चांगली मागणी असते. माईनमुळ्याचा उपयोग श्वासासंबंधी रोग, रक्तदाब व पर्यायाने येणारे हृदयरोग व कॅन्सर यासारख्या आजारांवर होतो. माईनमुळ्याची भाजी, कोशिंबीर व लोणचे यांचा आहारात वापर केल्यास, यासर्व रोगांचे त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते. पूर्वी हातकणंगले परिसरातील वडगाव, हेरले, नागाव या तीन चार गावांतच माईनमुळा लावला जाई. आता इतरत्रही लागवड होऊ लागली आहे. महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली व सातारा परिसरात या औषधी वनस्पतीची आंतरपीक म्हणून लागवड केली जाते.

माईनमुळ्याची लागवड : साधारणपणे जुलै ऑगस्ट महिन्यात या वनस्पतीची लागवड केली जाते. सर्वसाधारणपणे या वनस्पतीस १० ते २५ अंश से. तापमान व ८३ ते ९५ टक्के आर्द्रता मानवते. परंतु, उष्ण हवामान व कमी प्रमाणात आर्द्रता असल्यास पाणी दिल्याने वनस्पतीची वाढ चांगली होते. लागवडीस निचरा होणारी, रेताड, गाळाच्या जमिनी चांगल्या असतात. लागवड ही खोडाच्या छाट कलमाद्वारे करतात. माईनमुळ्याच्या दोन जातीची लागवड शेतकरी करतात उग्र वासाची जात

औषधीसाठी वापरली जाते, तर सौम्य वास असलेल्या जातीचे लोणचे करतात. माईनमुळ्याच्या झुडुपास फुलांचे तुरे आले की ते खुडुन टाकतात. म्हणजे मुळे चांगली वाढतात. या वनस्पतीला कीड लागत नाही. मात्र बुरशी लागु नये म्हणून झाडांवर निंबोणीच्या अर्काची फवारणी करावी लागते. लागवडीनंतर साधारणपणे १४० ते १५० दिवसांनी मुळे काढण्यास तयार होतात. एकरी ५ टन माईनमुळ्यांचे उत्पादन होऊ शकते.

माईनमुळ्याच्या झुडुपास फुलांचे तुरे आले की ते खुडून टाकतात. म्हणजे मुळे चांगली वाढतात. या वनस्पतीला कीड लागत नाही. मात्र बुरशी लागू नये म्हणून झाडांवर निंबोणीच्या अर्काची फवारणी करावी लागते. लागवड केल्यापासून साडे तीन चार महिन्यात मुळे तयार होतात. मुळे अवघी अर्धा इंच ते पाऊण इंच जाडीची असतात. चार ते सहा इंच लांबीची असतात. त्यावर बारीक बारीक मुळे आणि त्यात अडकलेली माती असते. मुळे घरी आणल्यावर, साफ करणे जिकिरीचे काम असते. माईनमुळा साधारण नोव्हेंबर, डिसेबर मधे बाजारात मिळतो. या औषधी वनस्पतीला बाजारात ३०,००० रुपये टन भाव मिळतो. यापासून तीन ते चार महिन्यातच शेतकरी लाखो रुपयाचा फायदा मिळवतात.

रोपे कुठे मिळतील : माईनमुळ्याची रोपे पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील नागार्जुन औषधी वनस्पती गार्डन येथे विक्रीस उपलब्ध आहे.

काळ्या माशीचे व्यवस्थापन

सध्या संत्रा, मोसंबी व लिंबू या फळबागांमध्ये काळ्या माशीचे प्रौढ मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. साधारणतः एप्रिल, ऑगस्ट आणि डिसेंबर महिन्यामध्ये काळी माशी अधिक सक्रिय असते. पुढील १० व १५ दिवसांत प्रौढ माश्या कोवळ्या पानातील रस शोषण करून पानांच्या खालील भागात अंडी घालतील. लिंबूवर्गीय फळपिकाला वर्षातून तीन म्हणजे मृग, हस्त आणि आंबिया असे तीन बहर येतात. काळ्या माशीच्या प्रत्येक बहरावर एक याप्रमाणे तीन पिढ्या होतात. त्यामुळे त्यावर वेळीच उपाययोजना करण्याची आवश्यकता असते.

ओळख : संत्र्यावरील काळी माशी आकाराने लहान असून १.० ते १.५ मि.मी. लांब असते. प्रौढ माशीचे पंख काळसर असून, तिच्या पोटाचा भाग लाल रंगाचा असतो. (तुलनेसाठी पांढऱ्या माशीचे पंख पांढरे असतात.) प्रौढ मादी माशी संत्र्याच्या नवतीच्या कोवळ्या पानांच्या खालील भागास वर्तुळात अंडी घालते. ही अंडी सूक्ष्म व सुरुवातीला पिवळसर रंगाची असतात. साधारणपणे चार ते पाच दिवसानंतर अंड्यांचा रंग करडा होतो.

जीवनक्रम : उन्हाळ्यात अंडी १५ ते २० दिवसात, तर हिवाळ्यात २५-३० दिवसात उबतात. अंड्यातून बाहेर पडलेली पिल्ले अतिशय लहान, चप्पट व फिक्कट पिवळसर रंगाची असतात. त्यामुळे ती सहजपणे दिसत नाहीत. पिल्ले पानावर फिरून योग्य जागेचा शोध घेऊन स्थिरावतात. पानातील अन्नरस शोषतात. काही दिवसानंतर ही

पिल्ले काळी पडतात. त्यामुळे काळ्या माशीचा प्रादुर्भाव लक्षात येतो. पिल्लांच्या तीन अवस्था असतात. त्या पूर्ण होण्यास चार ते सहा आठवड्याचा कालावधी लागतो. त्यानंतर पिल्ले कोषावस्थेत जातात. ही कोषावस्था सहा ते दहा आठवड्यांची असते. कोष पूर्ण काळे व टणक असतात.

प्रादुर्भावाची लक्षणे : प्रौढ माशी व पिल्ले कोवळ्या पानातील रस शोषतात. त्यांच्या अंगातून मधासारखा चिकट गोड पदार्थ उत्सर्जित होतो. या चिकट पदार्थामुळे पानांवर काळी बुरशी (कॅप्नोडिअम सिट्री) झपाट्याने वाढते. या बुरशीमुळे पूर्ण बाग काळी पडलेली दिसते. शेतकरी याला 'कोळशी' या नावाने ओळखतात. या कोळशीमुळे प्रकाश संश्लेषणाची किया मंदावते.

एकात्मिक व्यवस्थापन : बागेमध्ये झाडांची दाट लागवड करू नये. कॅनोपीमध्ये जास्त गर्दी राहणार नाही, याची काळजी घ्यावी. अधिक मात्रेत नत्रयुक्त खते देण्याचे टाळावे. बागेमध्ये पाणी साचू देऊ नये. यासाठी उतारास आडवे चर काढावेत. काळ्या पांढऱ्या माशीमुळे प्रादुर्भावयुक्त फांद्या छाटून त्या जाळून नष्ट कराव्यात. मृग, हस्त आणि आंबिया बहरातील नवती आल्यानंतर कोषातून माश्या बाहेर पडतात. नवतीच्या कोवळ्या पानांवर अंडी घालायला सुरुवात करतात. अंड्यातून बाहेर निघालेली पिल्ले सुरवातीला अतिशय लहान व नाजूक असतात. त्यामुळे ही अवस्था किडीच्या नियंत्रणासाठी महत्त्वाची असते. नवतीच्या हंगामात मलाडा डेसजारडेन्सी या मित्रकिटकाचे ३० अळ्या प्रति झाड याप्रमाणे दोन वेळा प्रसारण करावे. त्यामुळे या किडीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. पन्नास टक्के अंडी उबवण्याचा कालावधी आंबिया बहर (एप्रिलचा पहिला पंधरवडा), मृग बहर (जुलैचा दुसरा पंधरवडा), आणि हस्त बहर (डिसेंबरचा पहिला पंधरवडा) किडीच्या नियंत्रणासाठी योग्य ठरविण्यात आल्या आहेत. कीड पेरू, चिकू व डाळिंब अशा फळझाडांवरही येते. त्यामुळे शक्यतो अशी फळझाडे संत्रा बागेशेजारी लावू नयेत. प्रौढ उत्पत्ती व पन्नास टक्के अंडी उबण्याची स्थिती ही फवारणीकरिता योग्य वेळ असते. कारण या अवधीत किडींच्या प्रथमावस्था झाडांवर उपलब्ध असतात.

किडीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी फवारणी : निमतेल १० मि.लि. किंवा ॲझाडिरॅक्टीन (१ टक्के) ३ मि.लि. किंवा निम सोप किंवा करंज सोप ५ ग्रॅम (वनस्पतिजन्य घटक) इमिडाक्लोप्रीड (१७.८ एसएल) ०.५ मि.लि. किंवा थायामेथोक्झाम (२५ डब्ल्यूजी) ०.३ ग्रॅम किंवा डायमेथोएट हे २ मिली.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१९१६ : पाटणा उच्च न्यायालयाची स्थापना
१९२० : कोलकाता येथे महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारविरुद्ध असहकार आंदोलन सुरू केले.
१९३९ : दुसरे महायुद्ध जर्मनीने पोलंडमधील डांझिग शहर ताब्यात घेतले.
१९४५ : व्हिएतनामने (जपान व फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य घोषित केले.
१९४६ : भारतात अंतरिम सरकारची स्थापना झाली.
१९५८ : हेंड्रिक वरवोर्ड हे दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान म्हणून निवडून आले.
१९६० : केंद्रीय तिबेटी प्रशासनाची पहिली निवडणूक झाली.
१९७० : स्वामी विवेकानंद यांच्या स्मारकाचे उद्घाटन करण्यात आले.
१९७० : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने आपले अपोलो हे चंद्र मिशन काही कारणास्तव रद्द केले.
१९८७ : फिलिप्स कंपनीने पहिल्यांदाच बाजारात आणले.
१९९९ : भारतीय जलतरणपटू बुला चौधरी ही इंग्लिश खाडी दोनदा पोहणारी आशियातील पहिली महिला ठरली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३८ : भारतीय गुरु आणि तत्वज्ञ भक्तिविनाडो ठाकूर यांचा जन्म. (मृत्यू: २३ जुन १९१४)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ विल्हेल्म ऑस्टवाल्ड यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९५६)
१८७७ : फ्रेडरिक सॉडी नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २२ सप्टेंबर १९५६)
१८८५ : भारतीय समाजसुधारक, पत्रकार आणि श्री नारायण धर्म परिपालणाशी संबंधित क्रांतिकारक टी. के. माधवन यांचा जन्मदिन.
१८८६ : प्रा. श्रीपाद महादेव तथा श्री. म. माटे साहित्यिक, विचारवंत व अस्पृश्यता निवारणासाठी सतत प्रयत्न करणारे कृतिशील समाजसुधारक. १९१६ मध्ये त्यांनी दलितांसाठी रात्रशाळा काढली व वीस पंचवीस वर्षे मोफत शिकवले. (मृत्यू: २५ डिसेंबर १९५७)
१९२४ : केनिया देशाचे राष्ट्राध्यक्ष डॅनियेल अराप मोई यांचा जन्म.
१९३२ : स्नॅपल चे संस्थापक अर्नोल्ड ग्रीनबर्ग यांचा जन्म. (मृत्यू: २६ ऑक्टोबर २०१२)
१९४१ : साधना शिवदासानी ऊर्फ 'साधना' चित्रपट अभिनेत्री
१९५२ : जिमी कॉनर्स अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू
१९५३ : अहमदशाह मसूद अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री (मृत्यू: ९ सप्टेंबर २००१)
१९६५ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक पार्थो सेन गुप्ता यांचा जन्म.
१९७१ : भारतीय अभिनेते आणि राजकारणी पवन कल्याण यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू इशांत शर्मा यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

४२१ : कॉन्स्टान्शियस तिसरा (रोमन सम्राट, जन्म: ?).
१३९७ : फ्रांसेस्को लांडिनी (इटालियन संगीतकार, जन्म: १३२५).
१५४० : इथियोपियाचा सम्राट दावित (दुसरा) यांचे निधन.
१८२० : ज्यांगकिंग (चिनी सम्राट, जन्म: १३ नोव्हेंबर १७६०).
१८६५ : आयरिश गणितज्ञ विल्यम रोवन हॅमिल्टन यांचे निधन.
१९२१ : अँथोनी फ्रांसिस लुकास (अमेरिकन उद्योगपती, जन्म: ९ सप्टेंबर १८५५).
१९३७ : आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती चे स्थापक पियरे डी कौर्तिन यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८६३)
१९४७ : प्रसिद्ध भारतीय विद्वान, साहित्यकार व शिक्षणतज्ञ तसचं, अलाहाबाद आणि बनारस हिंदू विद्यापीठाचे माजी कुलगुरू अमरनाथ झा यांचे निधन.
१९६० : डॉ. शंकर पुरुषोत्तम आघारकर वनस्पतीतज्ञ, 'विज्ञानवर्धिनी महाराष्ट्र' या संस्थेचे संचालक, त्यांनी पुणे व मुंबई येथील सर्व स्थावर मालमत्ता संस्थेस देणगी दिली. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रविज्ञा विभागातर्फे मिळणाऱ्या प्रतिवार्षिक अनुदानावर संस्थेचा खर्च चालतो. (जन्म:)
१९६४ : फ्रांसिस्को क्रॅव्हेरो लोपेस (पोर्तुगालचे वे१३ राष्ट्राध्यक्ष, जन्म: १२ एप्रिल १८९४).
१९६९ : हो ची मिन्ह व्हिएतनामचे राष्ट्रपती (जन्म: १९ मे १८९०)
१९७६ : गणेश आत्माराम तथा विष्णू सखाराम तथा 'वि. स.' खांडेकर मराठी लेखक, कादंबरीकार, लघुनिबंधकार व समीक्षक, १९४१ मध्ये सोलापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, पद्मभूषण (१९६८), साहित्य अकादमी फेलोशिप विजेते (१९७०), त्यांनी 'कुमार' या टोपणनावाने कविता लेखन तर 'आदर्श' या टोपणनावाने विनोदी लेखनही केले आहे. त्यांच्या 'ययाति' या कादंबरीसाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार (१९७४) मिळाला आहे. (जन्म: १९ जानेवारी १८९८)
१९७८ : फ्रेड जी. मायर (अमेरिकन उद्योगपती, जन्म: २१ फेब्रुवारी १८८६).
१९९० : नरहर शेषराव पोहनेरकर निबंध, लघुकथा, कादंबरी, कविता आदी साहित्यप्रकार हाताळणारे लेखक आणि 'मराठवाड्याचा चालताबोलता इतिहास' (जन्म: ३ आक्टोबर १९०७)
१९९६ : पॅडी क्लिफ्ट (झिम्बाब्वेचे क्रिकेट खेळाडू, जन्म: १२ जुलै १९५३).
१९९९ : डी. डी. रेगे विलक्षण बोलक्या आणि जिवंत व्यक्तिचित्रणाच्या अत्यंत दुर्मिळ हातोटीमुळे अनेक नामवंतांकडून सन्मानित झालेले चित्रकार व लेखक, लोकसभा व विधानसभेतील अनेक राष्ट्रपुरुषांची चित्रे त्यांनी काढलेली आहेत. (जन्म: १७ डिसेंबर १९११ पाचल, राजापूर, रत्नागिरी)
२००९ : आंध्र प्रदेशचे १४ वे मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांचे विमान अपघातात निधन (जन्म: ८ जुलै १९४९)
२००१ : विश्वातील पहिले कृत्रिम हृदय प्रत्यारोपण करणारे दक्षिण आफ्रिकेतील महान हृदय विशेषज्ञ व सर्जन क्रिस्टियन बर्नार्ड यांचे निधन.
२०११ : रीनिवास विनायक खळे तथा 'खळे काका' संगीतकार, पद्मभूषण (२०१०) (जन्म: ३० एप्रिल १९२६)
२०१४ : भारतीय वकील आणि राजकारणी गोपाल निमाजी वाहनवती यांचे निधन. (जन्म: ७ मे १९४९)
२०१७ : शिरीष पै कवयित्री, लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या. शिरीष पै यांचे 'एक तारी', 'एका पावसाळ्यात', 'गायवाट', 'कस्तुरी', 'ऋतुचक्र' असे अनेक कवितासंग्रह वाचकांनी डोक्यावर घेतले आहेत. 'लाल बैरागीण', 'हेही दिवस जातील' या कादंबऱ्यांचे लेखनही शिरीष पै यांनी केले आहे.

थोडक्यात

मत्स्योदरी देवी संस्थानला ५१ हजारची देणगी

अंबड । प्रतिनिधी

१ सप्टेंबर रोजी श्री मत्स्योदरी देवी संस्थान, अंबडला वडीकाळा येथील श्री लक्ष्मण आसाराम रक्ताटे आणि सौ कौशल्याबाई लक्ष्मण रक्ताटे यांनी संस्थान परिसरात चालू असलेल्या बांधकामासाठी ५१००० (एक्कावन हजार रुपय) निधी देणगी स्वरूपात दिला आहे. यावेळी संस्था पुजारी , विश्वस्त श्री गीता विलास कुंटेफळकर , संस्थान व्यवस्थापक श्री कैलास शिंदे यांनी त्यांना देवीचा फोटो , शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी रक्ताटे परिवारातील सौ लक्ष्मी अरुण रक्ताटे ,आकाश अरुण पाटील, रुद्रराज अरुण रक्ताटे, ईश्वर भरत रक्ताटे व संस्थान कर्मचारी नामदेव राठोड, अर्जुन शिंदे आणि गोविंद कायस्थ उपस्थित होते.

राजस्थानी गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बालाजी मंदिर येथे झालेल्या राजस्थानी गणेश मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते अध्यक्ष पदी कपिल पगारिया आणि सचिव पदी तुषार भुतडा यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी राजस्थानी गणेश मंडळाची पूर्ण कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.यामध्ये अध्यक्ष कपिल पगारिया,सचिव तुषार भूतडा,सहसचिव आनंद सारडा,उपाध्यक्ष प्रवीण चांडक,अभिषेक खंडेलवाल,कोषाध्यक्ष सी.ए. सौरभ रेदासनी,राहुल चांडक,सहकोषाध्यक्ष ज्ञानेश भंडारी या निवडी वेळी रवी मानधने,विनय मोदानी,विकास भुतडा,कैलास मानधने,राहुल कासट,युवा संघटनेचे अध्यक्ष आकाश भुतडा,सचिव आनंद सारडा,रोहित मुगदिया,गणेश मंडळाचे माजी अध्यक्ष वरद रेदासणी,सचिव विशाल काबरा,युवा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष कैलास सारडा,जिल्हा सांस्कृतिक मंत्री आकाश बियाणी,जिल्हा सहसचिव कृष्णा कासट,रोहित नावंदर,धिरज कासट,आकाश मुगदिया तसेच राजस्थानी समाजातील ज्येष्ठ व युवा पिढी मोठ्या संख्येने उपस्थित होती.आणि ढोल प्रमुख म्हणून विनय मौदानी हे काम पहात आहे .

बाजीराव राऊत यांचे निधन

चौसाळा । प्रतिनिधी

भजन कीर्तन या सह हरीनाम सप्ताह या धार्मिक कार्यात विशेषतः गावातील हरीनाम साप्ताहत मृदंग वादक म्हणून सर्व परिचित असलेल्या नामःवंत मृदंग वादक बाजीराव शामराव राऊत मुळगाव रामवाडी मुक्काम चौसाळा यांचे नुकतेच ३१ऑगस्ट रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८४ वर्षाचे होते त्यांच्या निधना मुळे नागरिकांत हळहळ व्यक्त केली जाते कै बाजीराव शामराव राऊत हे मुळ रामवाडी परिसरातील घटेवाडी बेन्सूर भयाळा यांच्या सह इतर गावात मृदंग वादक म्हणून सर्व परिचईत होते त्यांना नागरिक बाजी आण्णा या नावाने ओळखत असत या सर्वपरिचित वादकाच्या अंत्यविधी च्या कार्याला भाउसंख्या ने नागरिक उपस्थित होते त्यांच्या श्रद्धांजली कार्यक्रमातून रामवाडी येथील कार्यकर्ते दत्तोबा अरसूळ यांनी आपल्या श्रद्धांजलीपत भाषणातून वादकाचा मृत्यू झाला ही घटना दुःखाची आहे असे सांगून आम्ही सर्व नागरिक एका मृदंग वाचकांच्या सह वासाला मुकलो अश्या शबतात त्याने आपली श्रद्धांजली अर्पण केली कै बाजीराव राऊत यांना दोन मुले तीन मुली सुना, नातवंडे आदी परिवार आहे पत्रकार बळी राम राऊत व श्रीराम राऊत वाहक बीड यांचे ते वडील होते तर पत्रकार एन टी वाघमारे यांचे ते मेहुणे होते त्यांच्या निधनामुळे नागरिकांस हळहळ व्यक्त केली जाते

मुहम्मद आरिफ अत्तार प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

बीड । प्रतिनिधी

शहरातील जुना बाजार भागात असलेल्या नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिपाई मुहम्मद आरिफ अब्दुल मजीद अत्तार हे ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती करिता आयोजित कार्यक्रमात शाळेचे प्राचार्य नवीद अहेमद सिद्दिकी यांनी हृदयी सत्कार करून निरोप दिला. मुहम्मद आरिफ अत्तार हे नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सन १९८८ साली शिपाई पदावर रुजू झाले होते. तेव्हापासून ते आतापर्यंत जवळपास ३६ वर्ष त्यांनी शाळेची सेवा केली. नियत वयोमानानुसार दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांच्या सेवेचा शेवटचा दिवस होता. या प्रित्यर्थ प्राचार्य नवीद अहेमद सिद्दिकी यांनी शाळेत एक छोटेखानी कार्यक्रम आयोजित करून या कार्यक्रमात त्यांना पुष्पहार, पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र, कपडे, मिठाई आदी साहित्य देऊन सत्कार करत निरोप दिला. यावेळी नदीम सर, अखील, आसेफ, शब्बीर, सरफराज, रहीम, जमीर, रऊफ भाई यांच्यासह सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसोबतच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जनतेच्या उपयोगी पडतील असे उपक्रम राबविणे कौतुकास्पद-आ.आजबे

पाटोदा । प्रतिनिधी

वाढदिवस माझा मात्र कार्यकर्त्यांनी उत्सवा सारखा साजरा करून आदर्श निर्माण केला आहे. मागील तीन दिवसांपासून पाटोद्या तालुक्यात रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वक्तृत्व स्पर्धा, स्पर्धा परीक्षा, वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, तर आज गरजवंत विद्यार्थ्यांना सायकल वाटप, तसेच मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजन करून खऱ्या अर्थाने जनतेच्या उपयोगी पडतील असे उपक्रम राबविल्या बद्दल कार्यकर्त्यांचे आभार आ. बाळासाहेब आजबे यांचे प्रतिपादन

आष्टी मतदारसंघाचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त पाटोद्यात आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

आष्टी मतदार संघाचे लोकप्रिय आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख जुनेद यांनी पाटोदा तालुक्यातील गरजवंत शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप तसेच लावणी सम्राज्ञी पुनम कुडाळकर यांचा सदाबहार लावणी कार्यक्रम गुरुवार दिनांक २९ ऑगस्ट गुरुवार रोजी संध्याकाळी नगरपंचायत कार्यालय पाटोदा येथे आयोजित केला होता.यावेळी आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते श्रीफळ फोडून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तसेच गरजवंत विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप सुध्दा करण्यात आले.यानंतर लावणी सम्राज्ञी पुनम कुडाळकर यांच्या ग्रुपच्या वतीने लावणी,गवळणी, लोकगीते तसेच हिन्दी, मराठी गाण्यावर उत्कृष्ट कला सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले यावेळी पुरुष,आबालवृद्धासह महिलांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. शिवाजी राऊत,ता.अध्यक्ष दिपक दादा घुमरे,काकासाहेब शिंदे, बप्पासाहेब जाधव,सोनेसावरगावचे सरपंच नारायण नागरगोजे (मामा)महासांगवीचे सरपंचपती नामदेव सानप,शाम हुले,मेजर गणेश खाडे,आदींची होती तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रियाज सिद्दीकी,मुन्नाभाई (बीड),मयुर बेंद्रे,आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन सय्यद सज्जाद यांनी केले तर उपस्थितांचे आभार शेख जुनेद यांनी मानले..

शहिद जवान अजित वाल्हेकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त विविध कार्यक्रम

पाटोदा । प्रतिनिधी

शहिद जवान लान्स नायक अजित सुखदेव वाल्हेकर यांच्या २३ व्यां स्मृती दिना निमित्त विर एकलव्य आदिवासी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय पाटोदा येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून साजरा केला.पाटोदा तालुक्यातील जवान लान्स नायक अजित वाल्हेकर सेवा भावी संस्था पाटोदा यांच्या वतीने शहीद जवान अजित वाल्हेकर यांच्या स्मृति दिना त्यांच्या स्मृतिस्थळावर अभिवादन करून शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले यावेळी नगरसेवक नय्युमभाई पठाण,सभापती किशोर अडगाळे,नगरसेवक हांनमत काळे,सुनील वाघमारे साहेब,खंडू जाधव,ढेरे साहेब, परमेश्वर गर्जे,शहादेव पवार, मारुती पवार, नवनाथ शिंदे, सागर तुपे,हजारे साहेब, आप्पा राऊत,अक्षय वीर, ऋषिकेश इंगोले, अजिंक्य जाधव, प्रशांत जाधव ,निखिल सरगर, विजय शिंदे, सुमित कुटे रोहन वीर, गणेश पाटोळे, सुजित अडगळे,ऋषिकेश वीर, विशाल घाडगे, सुरज मुळीक, यश चव्हाण विवेक गवळी, कृष्णा गवळी यांच्या सह आजी माजी सैनिक व वाल्हेकर मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता

उच्च शिक्षण घेऊन आपले आणि समाजाचे जीवन समृद्ध करुया-डॉ.हकाळे

जयभवानी विद्यालयात आरोग्य मार्गदर्शन

गेवराई । प्रतिनिधी

ग्रामीण भागातच खरी गुणवत्ता आहे, ग्रामीण भागातील मुले हुशार आणि होतकरू असतात. जिद्दीने अभ्यास करुन आपण उच्च शिक्षण घ्यावे आणि आपले आणि समाजाचे जीवन समृद्ध करावे असे आवाहन डॉ. तुषार हकाळे यांनी केले. जयभवानी विद्यालयात आरोग्य मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

शारदा ज्ञानोत्सवा अंतर्गत गढी येथील जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ' आरोग्य मार्गदर्शन व शंका समाधान ' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य व्हि.पी राठोड तर या कार्यक्रमाला आरोग्य तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र वडवणी येथील डॉ. तुषार हकाळे यांची प्रमुख उपस्थित होती. कार्यक्रमाचा प्रारंभ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली. या वेळी डॉ. तुषार यांनी आपला शिक्षण व शिक्षणाचा प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला. आपण ग्रामीण भागातले असलो तरीही आपण अभ्यास करून यश संपादन करू शकतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखुन आजच्या काळामध्ये शिक्षण घेऊन आपण आपले जीवन समृद्ध करायला हवे. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती सांगितली.यावेळी काही विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न विचारले व आरोग्य तज्ञांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंका दूर केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरिभाऊ हकाळे यांनी केले. सूत्रसंचालन रणजित बडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. लगड एस.एस. यांनी मानले. यावेळी प्रा.गायकवाड, प्रा. जाधव, परदेशी, गणेश जेधे, शिवाजी शेळके, सुदाम शेजाळ, राजेंद्र काळे, दादा तळेकर, पवार चंद्रकांत, अंगत शेजुळ, मनोहर बने, सोमेश्वर पाटेकर, प्रा. देवकर, शिंदे श्रीराम,श्रीमती वराट, काळे ,जाधव, जायभाये यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी आणि या.से.यो. स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवून सण उत्सव साजरा करा - चेतना तिडके

धारुर । प्रतिनिधी

पोळा, गणेश उत्सव व ईद ए मिलाद निमित्त आयोजित शांतता समितीत बोलताना अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके यांनी गणेश मंडळ पदाधिकारी व प्रतिष्ठित नागरिकांना आपल्या ऐतिहासिक शहरात शातंता व सुव्यवस्था अबाधित राखत सर्वांनी आपआपले सण उत्सव साजरे करावेत असे आवाहन केले.

येथील पोलिस ठाण्यात दि.३१ आगस्ट शनिवारी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत गणेश मंडळाकडून सुचना मागवण्यात आल्या. शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या खड्डे, लोंबकळणाऱ्या तारा, रस्त्यावर येणाऱ्या झाडांबाबत अनेकांनी सुचना केल्या. दि.१६ रोजी ईद ए मिलाद असल्यामुळे एक दिवसांपुर्वी विसर्जन करण्यात येणाऱ्या गणेश मंडळांनी उशिरा मिरवणूक काढून ईतरांचा आदर राखण्याची सुचनाही यावेळी करण्यात आली. यावेळी गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, ॲड. मोहन भोसले, शेख बाबुभाई, सुर्यकांत जगताप यांनी विचार व्यक्त केले. यावेळी अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके यांनी ऐतिहासिक किल्लेधारुर शहर हे शांतता प्रिय शहर असुन शहरात सर्वजाती धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आलेले आहेत. यामुळे आगामी काळात होत असलेल्या सण उत्सवही शातंता व सुव्यवस्था अबाधित राखत सर्वांनी साजरे करावित असे आवाहन केले. या बैठकीस प्रभारी तहसीलदार सुरेश पाळवदे, सहाय्यक पोलिस निरिक्षक दिनकर वाघमोडे, वीज मंडळाचे कनिष्ठ अभियंता विकास जोगदंड, पोलिस उपनिरिक्षक बाबासाहेब भवर, पत्रकार सय्यद शाकेर, यशवंत गायके यांच्यासह नगर परिषद व पंचायत समितीचे प्रतिनिधीसह गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा आ. प्रकाश सोळंके यांना पुरस्कार

विधान भवनात मंगळवारी राष्ट्रपतींच्या हस्ते होणार सन्मान

माजलगाव। प्रतिनिधी

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२०-२१ करिता महाराष्ट्र विधानसभा ''उत्कृष्ट भाषण'' पुरस्कारासाठी माजलगाव मतदार संघाचे भाग्यविधाते तथा लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांची निवड झाली असून दि. ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते आ. सोळंके यांचा विधान भवन मुंबई येथे सन्मान करण्यात येणार आहे.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांना सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी देण्यात येणाऱ्या ''उत्कृष्ट संसदपटू'' व ''उत्कृष्ट भाषण'' या पुरस्कारांसंदर्भात पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम मंगळवार, दि. ०३ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.३० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे.



या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र विधानसभा ''उत्कृष्ट भाषण'' पुरस्कार माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके यांना राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. दरम्यान आ. प्रकाश सोळंके यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल चा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे मतदार संघात तसेच सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मुरलीधर काळे यांचे निधन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका येथील सेवानिवृत्त लाईनमन मुरलीधर सोनाजी काळे वय ७३ वर्षे यांचे अल्पशा आजाराने अहमदनगर (अहिल्यानगर) येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान अल्पशा आजाराने दि.३१/०८/२०२४ शनिवार रोजी दुःखद निधन झाले.त्यांच्या दुःखद निधनाबद्दल धनगर जवळका व परिसरात हळहळ व्यक्त केली. मुरलीधर काळे यांचा स्वभाव सर्वांशी मिळून मिसळून व धार्मिक वृत्तीचा होता.त्यांचे कुटुंब महानुभव पंथाचे अनुयायी असल्याने ते श्रीकृष्णाचे भक्त होते.मागील १५ दिवसापूर्वी त्यांना अर्धांगवायूचा झटका आल्याने त्यांना अहमदनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते.त्यामध्ये त्यांचा बीपी कमी झाल्याने त्यांची प्रकृती खालावली व उपचारादरम्यान त्यांची शनिवारी रोजी सकाळी ९ वा.प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिव देहावर त्यांच्या शेतामध्ये सायंकाळी ६ वा.महानुभव पंथाच्या रितीरिवाजाप्रमाणे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी राजकीय,सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील तसेच शिक्षक, वकील, इंजिनिअर, व्यापारी, पत्रकार, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन विवाहित मुले,एक मुलगी,सुना,जावई, नात,नातवंड असा मोठा परिवार आहे. मुरलीधर काळे हे राष्ट्रीय समाज पक्षाचे पाटोदा तालुका माजी अध्यक्ष वसंत काळे यांचे वडील तर युवा नेते सुरेश काळे यांचे चुलते होते.

जलसंपदा विभागातील लक्ष्मण हजारे सेवानिवृत्त

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा (पाटबंधारे) विभागात कर्मचारी असलेले लक्ष्मण तुळशीराम हजारे (पांढरे) हे सेवानिवृत्त झाले आहेत. शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, रामानंद भारती महाराज तळेवाडी यांच्या हस्ते त्यांचा हृदयसत्कार करण्यात आला.

लक्ष्मण तुळशीराम हजारे (पांढरे) हे महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा (पाटबंधारे) विभागात कर्मचारी म्हणून सेवेत कार्यरत होते. त्यांची शासकीय सेवा वयोमानानुसार पूर्ण झाल्याने ते दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. बोरी पिंपळगाव येथील सभागृहात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या

अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सेवानिवृत्ती सत्कार सोहळ्यात, लक्ष्मणराव हजारे व त्यांच्या पत्नी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून महावस्त्र देत माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि हभप रामानंद भारती महाराज तळेवाडी यांनी हृदयसत्कार केला. याप्रसंगी शाखा अभियंता बागपिंपळगाव, व्ही ए परतवार, वि डी कुरले, सागर हिरे, बी बी देशमुख, संतराम काळे, बळीराम कऱ्हे, नारायण नवले, अशोक नरोटे, गणपत गायकवाड गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी लक्ष्मणराव हजारे यांना उर्वरित सुखी आणि निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. जलसिंचन विभाग पाटबंधारे यामध्ये काम करत असताना लक्ष्मणराव हजारे यांनी सातत्याने शासन आणि शेतकरी यांच्या हितासाठी काम केले. अनेक वेळा सुट्टीवर असतानाही त्यांनी गरजेच्या वेळी आपल्या सेवेला प्राधान्य दिले. त्यांचे हे कार्य खरोखर कौतुकास्पद आहे असेही बदामराव पंडित म्हणाले. यावेळी ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थिती होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धर्मराज करपे यांनी तर आभार प्रदर्शन जगदीश हजारे यांनी केले.

स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार सतीश आळेकर यांना जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण स्मृती समिती अंबाजोगाई च्या वतीने अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जाणारा स्व. भगवानरावजी लोमटे स्मृती राज्य पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, पटकथा लेखक सतीश आळेकर पुणे यांना जाहीर करण्यात आला आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या बैठकीत सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी प्रसिद्धीपत्रकातुन दिली आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने समाजकारण, साहित्य, संगीत, सांस्कृतिक, सहकार, शिक्षण, नाटक, सिनेमा आदी क्षेत्रात उतुंग कार्य करणाऱ्या मान्यवरास स्व. भगवानरावजी लोमटे यांच्या स्मृतिपित्यर्थ दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा हा बारावा पुरस्कार संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त पद्मश्री सतीश आळेकर, पुणे यांना दिला जाणार आहे. सतीश आळेकर हे गेली पन्नास वर्षापेक्षा आधिक काळ नाटककार म्हणून सर्वदूर परिचित आहेत. त्याच बरोबर सिनेमा ,पटकथा ,लेखन या माध्यमातून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

नाटक व सिनेमात त्यांनी अभिनयाबरोबरच उत्तम दिग्दर्शक म्हणून त्यांचे कार्य रसिकांच्या मनामनात आहे. जीवरसायन शास्त्रात त्यांनी पदवी प्राप्त केली आणि अगदी तारुण्याच्या उंबरठ्यावर ते नाटक लिहिणे आणि नाट्य चळवळ गतिमान करण्यात यशस्वी झाले. त्यांची मिकी आणि मेमसहेब, महानिर्वाण, महापूर, बेगम बर्वे, शनवार रविवार, पिढीजात आदी नाटके प्रसिद्ध व लोकाभिमुख झाली. झुलता पूल, सामना आदी एकांकिका या सर्वोत्तम लोकप्रिय झाल्या होत्या. जैत रे जैत या मराठी सिनेमाचे पटकथा लेखन त्यांनी केले. अनेक नाटकाचे दिग्दर्शन व अभिनय पण त्यांनी केले आहे. यशवंतराव चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आक्रित, उंबरठा आदी चित्रपटातुन त्यांनी आपल्या भूमिका साकारल्या आहेत. अंबाजोगाई येथेही त्यांच्या अनेक नाटकांचे प्रयोग झाले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. संगीत नाटक अकादमी पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. महाराष्ट्र शासनाचे अनेक नामांकित पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यात प्रभाकर पणशीकर जीवन गौरव पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या नाट्य व सिने क्षेत्रातील योगदान व कार्याची दखल घेवून स्व भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार सतीश आळेकर यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण न्या.अंबादास जोशी, माजी न्यायमूर्ती हायकोर्ट व लोकायुक्त गोवा राज्य यांच्या हस्ते व नाट्य कलावंत चंद्रकांत काळे यांच्या विशेष उपस्थितीत देण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पहार, रोख पंचवीस हजार रुपये असे असल्याचे प्रतिष्ठानचे सचिव दगडू लोमटे यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. यापूर्वी हा पुरस्कार, यशवंतराव गडाख - पाटील, विजय कुवळेकर, पद्मश्री ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, पं. नाथराव नेरळकर, विजय कोलते, मधुकर भावे, उल्हास दादा पवार, प्राचार्य रा. रं. बोराडे व पद्मश्री डॉ. यु. म. पठाण व प्रा. भास्कर चंदनशिव यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. या वर्षीचा बारावा पुरस्कार सतीश आळेकर यांना दि २१ सप्टेंबर २०२४ शनिवार रोजी अंबाजोगाई येथे प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती दगडू लोमटे यांनी दिली आहे.

परळी - बीड रस्ता पर्यायी पूल वाहुन गेल्याने वाहतूक बंद

परळी । प्रतिनिधी

परळी-बीड राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता रुंदीकरणाचे काम सध्या सुरू असून या रस्त्यावर सेलू फाट्यावरील व वडखेल जवळील खंडोबा माळाच्या बाजुचा पर्यायी पुल जोरदार पावसामुळे आलेल्या पुरामुळे वाहून गेल्याने व दोन-तीन दिवसांपूर्वी तयार करण्यात आलेला पांगरी येथील पूलावरुन पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद पडली आहे. यामुळे नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे.

परळी - बीड राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू आहे. काम सुरू करत असताना अगोदर पुलांची कामे करणे आवश्यक असताना किंवा पावसाळ्या अगोदर काम

पूर्ण करणे गरजेचे असताना गुत्तेदाराने ऐन पावसाळ्याच्या तोंडावर या पुलांचे काम सुरू केले आहे. परळी - बीड मार्गावर नागापूर येथून येणारी मोठी वाण नदी वाहते या नदीला दरवर्षी नागापूरचे वाण धरण भरल्यानंतर मोठ्या प्रमाणावर पूर येतो. वाण नदी, वाफ नदी, पापनाशी नदी याही नद्यावरील पुलाचे काम ऐन पावसाळ्याच्या तोंडावर सुरू करण्यात आले आहे. या कामाला वेळपण लागणार आहे.

काम सुरू करत असताना यश कन्ट्रक्शनने पुल पाडल्यानंतर या नद्यांवर जे तात्पुरते पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे याठिकाणी मोठ मोठ्या नाल्या टाकणे अपेक्षित होते. कारण या नद्या पावसाळ्यात दुधडी भरून वाहतात पण गुत्तेदाराने सुरुवातीला फक्त भराव टाकला होता. जसे काही या नद्यांना पाणी येणार नाही. दुष्काळ पडणार असल्याचा विश्वास गुत्तेदाराला होता. पण त्याच्या अपेक्षे प्रमाणे यंदा चांगले पाऊस पाणी झाल्याने नदीला पाणी आले.

बिंदुसरा काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

बीड । प्रतिनिधी

बिंदुसरा धरणाच्या काठावर असलेल्या बीड शहर व त्याखालील सर्व गावांना बिंदुसरा धरण पुर्ण भरल्याने नदीला पूर येण्याची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा नगरपालिका मुख्याधिकारी यांनी दिला आहे. बीड शहरासह परिसरातील बिंदुसरा काठावरील सर्व गावांना हा इशारा देण्यात आला आहे. विशेष करून बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांनी बीड शहरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे .दिनांक २० ऑगस्ट रोजी बिंदुसरा धरण पूर्णपणे भरल्याने नदीला पूर येण्याची शक्यता आहे .यातच रविवारी दिवसभर पाऊस चालू असल्याने मोठा पूर येऊन वित्तहानी तसेच मनुष्यहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जे नागरिक नदीच्या काठावर राहतात त्यांनी तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी अंधारे यांनी केले आहे.

थोडया थोडक्या पावसामुळे पिके तरली, शेतकरी आनंदात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ह्या दोन दिवसा पासून पावसाने अखेर रिपरिप का होईना पण हजेरी लावली आणि हळूहळू झालेल्या या पावसामुळे खरीप

हंगामातील पिके तरली असून त्यांना जीवदान मिळाले आहे यामुळे शेतकरी आनंदात असूनअंबाजोगाई तालुक्यात सर्वदूर पर्यंत समाधान पाऊस सुरु झाला.

अंबाजोगाई शहर आणि परिसरात देखील कमी जास्त प्रमाणात पावसाचे आगमन झाले शहराच्या बऱ्याच भागात पाणी साचले होते मात्र काही दिवसापासून उघडीप दिलेल्या पावसाने कमबँक केल्याने बळीराजा आनंदात आहे यंदा खरीप हंगामाच्या पेरणीच्या वेळी तालुक्यामध्ये अवकाळी पाऊस सुरु झाला त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या देखील सुरू केल्याचे दिसले पेरण्या जुलै अखेरपर्यंत चालू होत्या इतर प्रकाराच्या तुलनेत तालुक्यात सोयाबीनचे क्षेत्र यंदा विक्रमी आहे याशिवाय तूर,मूग,उडीद,मका ही देखील पिके शेतात दिसतात.

काही दिवसानंतर मोठ्या प्रमाणात असलेला पाऊस अखेर गायब झाला पाण्याअभावी पिके वाळू लागली बियाणे पेरून मोठ्या उत्पन्नाची आशा स्वप्न बाळगलेल्या शेतकऱ्यांचे चांगलेच हाल सुरू झाले सोयाबीनचे क्षेत्र मोठ्या ◀◀ पान ३ वर

माजलगावात श्री संतसेना महाराजांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

श्री संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त नवीन भाटवडगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी व संत सेना महाराज मंदिराच्या प्रांगणात श्रीमद्? भागवत महापुराण कथा व मंदिरास २५ वर्ष पूर्ती निमित्त मंदिराच्या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी मोठ्या उत्साहात झाला.

शहरापासून जवळच असलेल्या नवीन भाटवडगाव येथे मागील दहा वर्षापासून श्री संतसेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रीमद्? भागवत महापुराण कथेचे आयोजन करण्यात येते यावर्षी देखील कथेचे आयोजन करण्यात आले होते.

कथा प्रवक्ते म्हणून ह भ प परमेश्वर महाराज सोळंके हे तर कथेचे यजमान उर्मिला सतीश राऊत हे होते. मृदंगावर युवराज महाराज लवटे यांनी साथ संगत दिली. या ठिकाणी दिनांक २९ ऑगस्ट रोजी ह भ प विनोदाचार्य माऊली महाराज पुंगळकर यांचे हरिकीर्तन झाले. कीर्तनासाठी

श्रीमद् भागवत कथा, हरी किर्तन व मंदिराच्या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा

श्रोत्यांची मोठी उपस्थिती होती. दिनांक ३० ऑगस्ट रोजी ह भ प खडके महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता झाली. दरम्यान यावेळी श्री संतसेना महाराज व विठ्ठल रुक्मिणी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास पंचवीस वर्षपूर्ती निमित्त स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा खडके महाराजांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात समाज बांधवांची उपस्थिती होती. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन सौ. वेणूताई श्यामसुंदर दळवी, सौ. उषा नबाजी दळवी, सौ सिंधुताई माणिक राऊत यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुरेश विश्वंभर राऊत यांची मुंबई उच्च न्यायालय येथे क्लास वन राजपत्रित अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पहार, श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

श्रद्धा,शील,दान व प्रज्ञेशिवाय कोणीही उपासक होऊ शकत नाही- भिक्खू धम्मशील थेरो

माजलगाव । प्रतिनिधी

धम्मात सफलता प्राप्त करण्यासाठी सद्? गुणाची आवश्यकता असते, त्यासाठी उपासकांना चार सद्गुण आवश्यक असतात. ते म्हणजे श्रद्धा, शील, दान आणि प्रज्ञा.

प्रज्ञा म्हणजे शहाणपण, ते म्हणजे सत्य असत्यातील फरक जाणने, अनित्य, अनात्म, दुःखाचा बोध होणे तसेच आर्य अष्टांगिक मार्गाचा अवलंब करणे होय. श्रद्धेला शहाणपणाची म्हणजेच प्रज्ञेची जोड

हवी असते. उपासकाने दान कुणास द्यावे, कसे द्यावे यासाठी प्रज्ञेची गरज असते. प्रज्ञा तीन प्रकारची असते,इतरांचे ऐकून मिळते ती ''श्रुतमय प्रज्ञा',चिंतनातून मिळते ती ''चिंतनमय प्रज्ञा',प्रत्यक्ष अनुभवातून मिळते ती ''भावनामय प्रज्ञा''पण मनुष्याला प्रज्ञा ही प्रत्यक्ष अनुभवातूनच येते.

उपासकाला दान देताना सहा गोष्टीचे स्मरण हवे.श्रद्धायुक्त अंतःकरणातून दान द्यावे,दान विधीपूर्वक द्यावे दोन्ही हाताने गुडघ्यावर बसून विनम्रतेने निस्वार्थपणे परतफेडीची अपेक्षा न करता द्यावे.,एकाग्रचित्ताने जागृतीपूर्वक दान द्यावे,द्वोषभावना विरहित मैत्रीयुक्त चित्ताने दान द्यावे,अहंकार विरहित दान द्यावे, लोभविरहित भावनेने, निरपेक्ष भावनेने दान द्यावे. या चारही सद्? गुणा शिवाय मनुष्याला सुख नाही निर्वाण नाही तसेच जीवन सार्थकी लागत नाही. श्रद्धा, शील, दान, व प्रज्ञेशिवाय खरा उपासक होऊ शकत नाही. असे प्रतिपादन पू.भिक्खू धम्मशील थेरो यांनी श्रावस्ती बुद्ध विहार माजलगाव येथे ◀◀ पान ३ वर

कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मॉकड्रील प्रात्यक्षिक

परळी । प्रतिनिधी

येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयामध्ये आपत्कालीन स्थितीत त्या संकटाला सामोरे जाण्यासाठी आपण कशी काळजी घेतली पाहिजे आणि लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मॉकड्रील व्यवस्थापन कसे केले पाहिजे या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सेफ इंटरप्राइजेस परळी वैजनाथचे संचालक शेख शरीफभाई यांनी

दिले.आपत्कालीन व्यवस्थेमध्ये नियंत्रण मिळवण्यासाठी दिलेले हे सुंदर असे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी पाहिले. यावेळी काही विद्यार्थिनींनी या मॉडलचे स्वतःही प्रात्यक्षिक केले. यावेळी श्री अनिल जठार यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष मा. संजयजी देशमुख ,संचालिका तथा प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे , संचालिका सौ. छायाताई देशमुख , प्राध्यापक व विद्यार्थिनी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.

परळी शहरातील भीम नगर येथील शेतकऱ्यांची मुलगी बनणार डॉक्टर

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील भीम नगर येथील शेतकऱ्यांची मुलगी डॉक्टर बनणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकार द्वारे देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील भीम नगर येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेले विलास भानुदास आदोडे यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा शैक्षणिक वारसा किंवा शैक्षणिक वातावरण व शैक्षणिक मार्गदर्शन नसताना यांची मुलगी कुमारी अनिशा विलास आदोडे तिने नेट परीक्षेत ५७२ मार्क देऊन घवघवीत यश संपादन केल्यामुळे तिची

आंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल कॉलेज येथे एमबीबीएस साठी निवड झाली असून तसे तिला आज दिनांक एक नऊ २०२४ रोजी नियुक्तीपत्रही प्राप्त झाले असून तिच्या या यशाबद्दल भीमनगर वासियाकडून तिचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत असून पुढील कार्यास शुभेच्छा ही देण्यात आल्या असल्याची माहिती ही प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे

तुंबलेल्या नाल्यातील पाणी रस्त्यावर व घरात घुसत असल्याने मंगळवार पेठ परिसरातील लहान थोरांचे आरोग्य धोक्यात

मंगळवार पेठ परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा कुणी वाली आहे का? नागरिकांचा संतप्त सवाल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. दर दिवशी थोड्या फार प्रमाणात पाऊस पडतो आहे. पाऊस पडला की पाण्याचा निचरा होण्यासाठी ज्या त्या ठिकाणी नाल्या केलेल्या आहेत. मात्र जवळपास पन्नास वर्षांपासून मंगळवार पेठ परिसरात मोठा नाला आहे. त्या नाल्यावर अनेक ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. झालेल्या अतिक्रमनामुळे दुरपासून येत असलेले पाणी मोठ्या प्रमाणावर नाल्यातून येत आहे. मोठ्या प्रमाणावर येत असलेले पाणी व कचरा नाल्यामध्ये तुंबल्याने नाल्यातील पाणी मंगळवार पेठ परिसरातील मुख्य रस्त्यावर सर्वत्र पाणीच पाणी होऊन नाल्यातील घाण पाणी रस्त्यावर येऊन ते अनेकांच्या घरात घुसत आहे. या घाण पाण्यामुळे परिसरात सर्वत्र दुर्घन्धी पसरली आहे. घरांत घुसलेल्या पाण्यामुळे घरातील लहान बालके , स्त्रिया, जेष्ठ नागरिक यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आगोदरच अंबाजोगाई शहरात डेंग्यूच्या रोगाने थैमान घातले आहे . मात्र अशाही परिस्थितीत अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन ◀◀ पान ३ वर

अतिवृष्टीमुळे शेतकरी राजा उद्ध्वस्त ;तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या

परळी । प्रतिनिधी

मागच्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात सतत पाऊस पडत आहे. कधी निसर्गाचा लहरीपणा तर कधी राज्यकर्त्यांच्या शेतीविषयक उदासीन धोरण यामुळे बळीराजा कायमच संकटात सापडलेला आहे. पिकलं तर विकत नाही आणि विकलं तर पिकत नाही असे अवस्था सध्या बळीराजाची झाली आहे. त्यातच सध्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला खरीपांच्या पिकाचा घास अतिवृष्टीमुळे हिरावून जात आहे.

यामुळे शेतकरी राजा पूर्णपणे

कृषिमंत्र्यांनी आश्वासनाचा पाऊस पाडायचा थांबून निसर्गाच्या पावसानं उध्वस्त झालेला शेतकऱ्यांना आधार द्यावा तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

उध्वस्त होत असून तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद शचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सध्या परळी विधानसभा मतदारसंघाच्या सर्वच मंडळात मोठ्या प्रमाणात पावसाने रुद्ररूप धारण केले आहे. .कापूस सोयाबीन हे पीक जास्त पावसामुळे ८० टक्के उत्पन्न शेतकऱ्यांच्या हातातून गेले आहे. या शेतकऱ्यांना आधार देण्याचं काम करावे तसेच स्थानिक आमदार व बीड जिल्ह्याचे कृषीमंत्री यांनी पिक विमा अतिवृष्टी अनुदान याच फक्त वारंवार शेतकऱ्यांना आश्वासनाच देण्याचं काम केलं आहे हा आश्वासनाचा पाऊस पाडायचा थांबून उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ पंचनाम्याचे नाटक न करता सरसकट आर्थिक मदत करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केली आह.

शक्तीपीठ महामार्गाची अधिसूचना रद्द करा यासह शेतकऱ्याच्या विविध प्रश्नावर चालू असलेले मोहन गुंड यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित

आंबेजोगाई । प्रतिनिधी

शेतकरी कामगार पक्ष नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्ग बाधीत शेतकरी संघर्ष समितीचे राज्य अध्यक्ष भाई दिगंबर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर लढा सुरू आहे .त्या अनुषंगाने संघर्ष समितीचे मराठवाडा समन्वयक भाई मोहन गुंड व बाधीत शेतकर्यांनी शक्तिपीठ महामार्ग, अधिसूचना रद्द करा या प्रमुख मागणीसह विविध प्रश्नांवर सोमवार २६ ऑगस्ट पासून उपविभागीय कार्यालय आंबेजोगाई येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांची सार्वजनिक बांधकाम व उपक्रम मंत्री यांच्या बरोबर चर्चा झाली त्यांनी १५ दिवसानंतर शक्तिपीठ सबंधित सर्व आधिकरी व आपल्या संघर्ष समितीचे पदाधिकारी यांच्या बरोबर बैठक आयोजित करण्यात येईल असे सांगितले तसे भाई जयंत पाटील यांनी पत्र दिले. राज्याचे कृषिमंत्री ना धनंजय मुंडे यांनी

बीड चे खासदार बजरंग सोनवणे यांनी भ्रमणध्वनी द्वारे आंदोलकांशी चर्चा केली. सदरील आंदोलनास माजी आमदार पृथ्वीराज साठे,

मंत्रालयात संबंधित विभागाचे मंत्री व अधिकाऱ्यासोबत संघर्ष समीतीची होणार बैठक

रमेश आडसकर, कॉ काशिनाथ कापसे , कालिदास आपेट, डॉ नरेंद्र कांबळे, कॉ बब्रुवान पोटभरे, माधव जाधव, अनंत जगतकर, अचुत गंगणे,बन्सी जोगदंड जीवन गायकवाड नासेर शेख, संजय साळवे, शाहीर तुकाराम सुवरणकर, सुलभा सोळुंके. विविध पक्ष पदाधिकारी यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.

मुळात शेतकऱ्यांना त्यांची भूमिका मांडण्याचा अधिकार हिरावून घेणारा अधिनियम १९५५ हा शक्तिपीठ महामार्ग साठी लावणे हेच अन्यायकारक आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने हडप करू नयेत बाधीत जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहेत . मुख्यमंत्री महोदय यांना अनेक वेळा मेल द्वारे तसेच जिल्हाधिकारी मार्फत निवेदन देवून हि कसलीच दखल न घेतल्याने बाधीत शेतकऱ्यांच्या वतीने अंबाजोगाई येथे अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले होते.भाई मोहन गुंड व संघर्ष समितीचे पदाधिकारी बाधीत शेतकरी यांनी अन्नत्याग सुरू केला होता या मध्ये प्रमुख मागणी शक्तिपीठ महामार्ग, अधिसूचना रद्द करा, तसेच बीड जिल्हा ७५% उर्वरित विमा वाटप करा, ◀◀ पान ३ वर

प्रा. डॉ.विनोद जगतकर यांचा कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात सत्कार

परळी । प्रतिनिधी

संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अशासकीय सदस्य पदी निवड झाल्याबद्दल प्रा. डॉ. विनोद जगतकर यांचा सत्कार सोहळा संपन्न. कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील माझे सहकारी डॉ.आर.एल. जोशी प्रा. प्रवीण फुटके प्रा. नव्हाडे, प्रा.शरद रोडे प्रा. विशाल पौळ,विकास देशपांडे इत्यादी याप्रसंगी उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

अखेर नदीत शिर नसलेल्या त्या मृतदेहाचे गूढ उकलण्यात पुणे पोलिसांना यश; भावाने आणि वहिनीनेच केला खून

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील नदी पात्रात सापडलेल्या मृतदेहाचा उलगडा झाला आहे. त्या मृतदेहाचे गूढ उकलण्यात पुणे पोलिसांना यश आलं आहे. तो मृतदेह सकीना खान नावाच्या महिलेचा असल्याची माहिती समोर आली आहे. झोपडपट्टीतील एका खोलीच्या मालकीच्या वादातून सख्खा भाऊ आणि वहिनीने सकीना खानची हत्या केली आणि घरात धारदार शस्त्राने मृतदेहाचे अनेक तुकडे केले. त्यानंतर पुण्यात खूप पाऊस होता त्या दिवशी संगमवाडी येथील नदीपात्रात फेकून दिले. त्यानंतर सकीना गावाला गेल्याची खोटी माहिती शेजाऱ्यांना दिली. मात्र शेजाऱ्यांना संशय आल्यावर त्यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर या हत्येचा उलगडा झाल्याची माहिती समोर आली आहे. पोलीसांनी सकिनाचा भाऊ अशपाक खान आणि वहिनी हमीदा यांना अटक केली आहे. पुण्यातील पाटील इस्टेट भागतील एका खोलीच्या मालकीतून ही हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. ही खोली सकीनाच्या नावावर होती. सकीनाचा भाऊ आणि वहिनी तीला घरातून निघून जाण्यास सांगत होते. मात्र ती जात नसल्याने तीची हत्या करण्यात आली आहे.

या प्रकरणात पुणे पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी दिसून येत आहे. २६ ऑगस्ट रोजी शिर नसलेलं मृतदेह पुण्यातील मुठा नदीत वाहत आलं होतं. या प्रकरणाचा तपास अत्यंत काटेकोरपणे करत पुणे पोलिसांनी छडा लावला आहे. २६ ऑगस्ट रोजी पुणे शहरातील चंदननगर पोलिस स्टेशनच्या हद्दीत मुळा मुठा नदीमध्ये शीर, हात-पाय नसलेल्या अवस्थेत महिलेचा विवस्त्र मृतदेह आढळून आला होता. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ ऑगस्ट रोजी दुपारी चंदननगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मूळा मुठा नदी पत्रात एक मृतदेह तरंगत असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली होती. हा स्त्रीचा मृतदेह आहे. शीर आणि हात पाय नसलेल्या अवस्थेमध्ये विवस्त्र मृतदेह पाण्यात आढळला होता.

जोगेश्वरी गूळ कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ

बारामती । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता त्यांना शेतीशी निगडित पूरक व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देणे, मदतीसाठी मार्गदर्शन करणे, तसेच तंत्रज्ञान, अनुदान शासनस्तरावर उपलब्ध करून दिल्यास महाराष्ट्रात शेतकरी प्रोड्यूसर कंपन्या व्यवसायात यशस्वी होऊ शकतात. त्याचे उत्तम उदाहरण खामगळवाडी (ता. बारामती) येथील जोगेश्वरी किसान समृद्धी प्रोड्यूसर कंपनीने गूळ निर्मिती कारखान्याच्या माध्यमातून पुढे आणले आहे,ऋ असे प्रतिपादन मुंबई दुरदर्शन केंद्राचे कार्यक्रम अधिकारी भारत हरणखुरे यांनी केले.

खामगळवाडी-पणदरे (ता.बारामती) येथे शनिवार (ता.३१) रोजी दूरदर्शन केंद्र - मुंबई व जोगेश्वरी किसान समृद्धी प्रोड्यूसर कंपनी लि,बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने दूरदर्शन कृषी सल्लागार समितीची महत्वपुर्ण बैठक पार पडली. याप्रसंगी उपस्थित शेकऱ्यांशी संवाद साधताना दुरदर्शन केंद्राचे कार्यक्रम अधिकारी भारत हरणखुरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जोगेश्वरी किसान समृद्धी प्रोड्यूसर कंपनीच्या प्रमुख सौ.स्वाती अरविंद शिगाडे होत्या. सहाय्यक आयुक्त डॉ.शितल नवले, डॉ.देशमुख, डॉ. गावंडे, अरविंद शिंगाडे, एनवायरमेंट डिपार्टमेंटचे जनरल डायरेक्टर डॉ. सुनिल कांबळे, डॉ.भिकाने यांच्यासह राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन विभागाचे शास्त्रज्ञ, नारायणगाव व जालना कृषी विज्ञान केंद्र प्रमुख आदी मान्यवर उपस्थित होते. विशेषतः यावेळी जागेश्वरी गूळ कारखान्याचा ऊस गळीत हंगाम शुभारंभही भारत हरणखुरे यांच्यासह वरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

दरम्यान, शेती व शेती पुरक व्यवसायात सकारात्मक दृश्य दिसण्यासाठी शासन स्तरावर अनेक योजना कार्यान्वित झाल्या आहेत, असे सांगून दुरदर्शन केंद्राचे कार्यक्रम अधिकारी श्री. हरणखुरे म्हणाले,ऋऋ शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय्य करणे या उद्देशाने बारामतीचे अजैविक ताण व्यवस्थापन संस्थेचे कार्य उल्लेखनिय आहे. याचा फायदा अधिकाधिक शेतकऱ्यांनी घ्यावा,ऋऋ असे आवाहन त्यांनी केले. शून्य मशागत, रुंद वाफा व सरी (बीबीएफ) तंत्रज्ञान अवलंबण्यास प्रोत्साहन देण्याबाबतही उपस्थितीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत अरविंद शिंगाडे यांनी केले, तर आभार नागपूर दूरदर्शनचे मनोज जैन यांनी मानले.

राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर गोळीबार

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची खळबळजनक घटना रविवारी रात्री नाना पेठेत घडली. आंदेकर यांच्यावर गोळीबार करणाऱ्या हल्लेखोराचा पोलिसांकडून शोध घेण्याात येत आहे. गणेशोत्सवाच्या तोंडावर माजी नगरसेवकावर गोळीबार करण्यात आल्याने मध्यभागात घबराट उडाली.

वनराज आंदेकर रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास नाना पेठेतील डोके तालीम परिसरात थांबले होते. त्यावेळी त्यांच्यावर हल्लेखोराने पिस्तुलातून पाच ते सहा गोळ्या झाडल्या. गोळीबार झाल्याची माहिती मिळाल्यानंतर परिसरात घबराट उडाली. गोळीबाराच्या घटनेपूर्वी डोके तालीम परिसरातील वीज पुरवठा खंडित झाला होता. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वनराज यांच्यावर निकटवर्तीयाने गोळीबार केला असून, कौटुंबिक वाद तसेच वर्चस्वाच्या वादातून गोळीबार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. नाना पेठेत आंदेकर टोळीचा दबदबा आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेवटच्या श्रावणी सोमवारी श्रीक्षेत्र भीमाशंकर दर्शनासाठी येणार

मंचर । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेवटच्या श्रावणी सोमवार निमित्त सोमवारी (ता .२) श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येणार आहेत. अशी माहिती युवा सेना राष्ट्रीय कार्यकारणी सदस्यसचिन बांगर यांनी मंचर येथे पत्रकारांना दिली.

बांगर म्हणालेगेली अनेक वर्ष मुख्यमंत्री शिंदे शेवटच्या श्रावणी सोमवार निमित्त भीमाशंकर येथे सहकुटुंबदर्शन घेऊन अभिषेक करतात. त्यानुसार सोमवारी ते ठाणे निवासस्थान पासून सकाळी पावणेअकरा वाजता हेलिपॅड कडे जाण्यासाठीनिघणार आहेत.

सकाळी साडेअकरा वाजता भिगेगाव(ता. आंबेगाव)येथे हॉटेल ब्ल्यू मॉरमनच्या हेलिपॅड वर त्यांचे आगमन होईल. तेथून मोटारीने दुपारी बारा वाजता श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर येथे आगमन दर्शन व अभिषेक होईल त्यानंतर ते हॉटेल ब्ल्यू मॉरमन पासून हेलिकॉप्टर द्वारे पुन्हा ठाणे येथे मार्गस्थ होणार आहेत.

या पार्श्वभूमीवर बांगर, प्रवीण थोरात पाटील, देविदास दरेकर,भगवान पोखरकर, अशोक मोढवे व अन्य शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी हॉटेल ब्ल्यू परिसरात असलेल्या हेलिपॅड ची पाहणी करून श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी यांच्या समवेत चर्चा केली.

रोडरोमिओंचे फोटो फ्लेक्सवर टांगणार:पोलिस आयुक्त अमितेशकुमार

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सवात महिला-तरुणींची छेड काढणार्या रोडरोमियोंचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांनी जालीम उपाय शोधला असून, त्यांचे फोटो काढून भर चौकात फ्लेक्सवर लावले जाणार आहेत. एवढेच नाही तर रोडरोमिओंची परेड देखील पोलिस घेणार आहेत. त्यामुळे महिलांची छेडछाड करात तर सावधान असा सज्जड दमच पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी रोडरोमियोंना दिला आहे.

पुण्यातील गणेशोत्सवाची ख्याती सर्वदूर आहे. हा उत्सव पाहण्यासाठी देश विदेशातून नागरिक येत असता. मध्यवस्तीत उत्सवकाळात भाविकांची मोठी गर्दी असते. त्याच गर्दीचा फायदा घेत रोडरोमिओंकडून महिला-तरुणींची छेड काढण्याचे प्रकार घडतात. त्यापार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पोलिसांना सुचना दिल्या आहेत. सुरक्षेच्यादृष्टीकोनातून पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जाते आहे. महिलांच्या सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते आहे. त्यासाठी महिला पोलिस, दामिनी मार्शलची पथके तैनात करण्यात येणार आहेत. तसेच गुन्हे शाखेच्या पथकांना छेडछाड करणार्या रोडरोमिओंची कुंडली तयार करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. महिलांच्या सोबत गैरकृत्य करताना कोणी आढळून आले तर पोलिस त्यांचे फोटो काढून शहरात फ्लेक्सवर नावासह लावणार आहेत. तसेच त्यांची रस्त्यावर परेड सुद्धा घेणार आहेत.

उत्सव काळात भाविकांना माहित आणि सुक्षेच्याबाबतीत गौरसोय होऊ नये म्हणून पोलिसांकडून अठरा मदत केंद्रे उभारण्यात येणार आहेत. शहराच्या मध्यवस्तीत चोवीस तास ही मदत केंद्रे सुरु असणार आहेत. या केंद्रावर स्थानिक पोलिस ठाणे, विशेष शाखा, गुन्हे शाखा, वाहतूक विभाग यांचे अधिकारी कर्मचारी काम करणार आहेत. शहराच्या मध्यवस्तीत प्रमुख सहा ठिकाणी पोलिसांच्या शीघकृतीदलाची पथके तैनात करण्यात येणार आहेत. प्रामुख्याने विसर्जन मिरवणूकीच्या मार्गावर ही पथके पहारा देणार आहेत. त्यासाठी मचान बांधण्याची व्यवस्था देखील पोलिसांनी केली आहे.दहा दिवस त्यांच्याकडून उंचावरून सर्व हालचालीवर त्यांच्याकडून लक्ष ठेवले जाणार आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विदेशी मद्यासह ७६ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभागीय भरारी पथकाने मुळशी तालुक्यात आदरवाडी गावाच्या हद्दीत, हॉटेल शैलेश समोरील पौड-माणगाव रस्त्यावर केलेल्या कारवाईत गोवा राज्य निर्मित विदेशी मद्यासह एकूण ७६ लाख ५५ हजार ५०० रूपयेकिमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोवा राज्य निर्मीत व फक्त गोवा राज्यातच विक्रीकरीता परवानगी असलेल्या पोलंड प्राईड प्रिमियम कलेक्शन रिझर्व्ह व्हिस्की या ब्रॅण्डच्या विदेशी मद्याच्या १८० मिली क्षमतेच्या ३३ हजार ६०० सीलबंद बाटल्या (७०० बॉक्स) वाहनात मिळून आल्या. मद्याची वाहतूक करण्याकरीता वापरलेला टाटा मोटर्स कंपनीचा तपकिरी रंगाचा सहाचाकी टेम्पो वाहन क्र. एमएच-०३- डीव्ही ३७१६ व मोबाईल फोन असाअंदाजे ७६ लाख ५५ हजार ५०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या गुन्ह्यामध्ये वाहन चालक जुल्फेकार ऊर्फ जुल्फेकार ताजअली चौधरी (वय ५० वर्षे) रा. हाऊस नं. २०४, मोहल्ला नाली पाडा, मसूरी डासना आर. एस. जि. गाजियाबाद, उत्तरप्रदेश यास जागीच अटक करून त्याचेविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे विभागीय उपआयुक्त सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार दुय्यम निरीक्षक विराज माने, अतुल पाटील, धीरज सस्ते, जवान प्रताप कदम, सतिश पोंधे, अनिल थोरात, शशीकांत भाट, राहुल ताराळकर, महिला जवान उषा वारे आदींनी केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक विराज माने करत आहेत, अशी माहिती पुणे विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक नरेंद्र थोरात यांनी दिली आहे.

मोबाईल,पाकीटमार चोरट्यांचा बंदोबस्त

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सवातील गर्दीचा फायदा चोरटे भाविकांचा लाखोंचा ऐवज लंपास करतात. खास चोर्या करण्यासाठी परराज्यातील चोरटे पुण्यात या काळात दाखल होतात. मोबाईल चोरट्यांची संख्या तर फार मोठी असते. कोट्यावधी रुपये किंमतीचे मोबाईल शहरातून चोरी होतात. महिलांचे दागिणे, पैशांची पाकिटे अशा ऐवजावर हात साफ करतात. त्यामुळे त्यांच्या बंदोबस्ताची खास जिम्मेदारी गुन्हे शाखेच्या पथकांवर देण्यात आली आहे. गुन्हे शाखेने आत्तापासूनच याबाबत प्रतिबंधात्मक कामाला सुरुवात केली आहे. चोर्या करणार्या चोरट्यांची पोलिसांकडून यादी करून ही कारवाई करण्यात येते आहे.त्याचबरोबर परराज्यातून येणार्या चोरट्यांवर सुद्धा लक्ष केंद्रीत करून त्यांचे रेकॉर्ड जमा केले जाते आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यास करताना वर्तमान आणि भविष्याचा विचार करावा-डॉ. देगलूरकर

पुणे । प्रतिनिधी

''छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील माणसा-माणसामध्ये प्रतिष्ठा निर्माण केली होती. त्यामुळे सर्वसामान्य लोकही राष्ट्रकार्याला लागले होते. शिवाजी महाराजांचे कार्य हे केवळ एकविसाव्या शतकातच नव्हे, तर इतर कोणत्याही काळात तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यास करताना आपण त्यावेळची पार्श्वभूमी, वर्तमान आणि भविष्याचाही विचार करायला हवा,'' असे मत मूर्तीशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित विविध उपक्रमांचा भाग म्हणून विद्यापीठामध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद झाली. या परिषदेच्या समारोपप्रसंगी डॉ. देगलूरकर बोलत होते. यावेळी खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. देगलूरकर म्हणाले,''स्वयंभू, स्वधर्म, स्वराज्य, साक्षेप आणि स्वयंसिद्धता ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची वैशिष्ट्ये होत.'' यावेळी रावत म्हणाले,''तत्कालीन भारतातील सहिष्णू समाज जिवंत ठेवण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. त्यामुळेच हिंदू समाजामध्ये त्यानंतरच्या काळातील प्रबोधनाचे युग अवतरू शकले.'' या कार्यक्रमात विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. संजय तांबट यांनी प्रास्ताविक, तर डॉ. सदानंद भोसले यांनी सूत्रसंचालन केले.

इंदापुर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राजकुमार थोरात

इंदापूर । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद प्रमुख विश्वस्त एस. एम. देशमुख, राज्य अध्यक्ष शरद पाबळे, जिल्हा अध्यक्ष सुनिल लोणकर यांच्या मार्गदर्शन आणि सुचनेप्रमाणे इंदापुर तालुका पत्रकार संघाची निवडणुक रविवार दिनांक १/९/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर निवडणुक प्रक्रिया ही सहमतीने बिनविरोध पार पडली. यावेळी अध्यक्षपदी राजकुमार थोरात यांची निवड करण्यात आली.ङ्गझालेल्याँ ठकीत शहाजी राजेभोसले, शत्रुघ्न ओमासे, डॉ. गजानन टिंगरे यांची उपाध्याक्ष म्हणून निवड करण्यात आली, सचिव तात्यासाहे घाटे, सहसचिव प्रदिप तरंगे, खजिनदार हरिदास वाघमोडे, सह. खजिनदार महेश गडद, संघटक ळासाहे धावडे, संघटक धनंजय थोरात, सह. संघटक संभाजी रनवरे, समन्वयक संतोष. भरणे, सल्लागार डॉ. विकास शहा. अशी कार्यकारणी निवडण्यात आली, निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन रविंद्र पाटील आणि सहाय्यक म्हणुन एम.जी. शेलार यांनी काम पाहिले. नव निर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार माजी मंत्री दत्ता मामा भरणे यांनी केला. परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख. राज्य अध्यक्ष शरद पाबळे, विभागीय सचिव गणेश मोकाशी, पाबळे, पुणे जिल्हा अध्यक्ष सुनिल लोणकर यांनी अभिनंदन केले तसेच जिल्हा महिला पत्रकारसंघ अध्यक्षा श्रावणी कामथे यांनी फोनद्वारे सर्वांचे अभिनंदन केले.

आमदार चेतन तुपेंना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर

हडपसर । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानमंडळातील राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार हडपसर विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन विठ्ठल तुपे पाटील यांना जाहीर झाला असून मंगळवार (दि.३) रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचे हस्ते मुंबई विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात प्रदान करण्यात येणार आहे.

हडपसर किंवा पूर्वीचा पुणे - कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ यातून निवडून आलेले,असा पुरस्कार मिळवणारे चेतन तुपे पाटील हे पहिलेच आमदार आहेत.माजी मंत्री तत्कालीन आमदार गिरीश बापट यांच्या नंतर वीस वर्षांनी चेतन तुपे पाटलांच्या रूपाने हा पुरस्कार पुणे शहरातील आमदाराला मिळालेला आहे. विधिमंडळाच्या कामकाजातील नियमित सहभाग, विधिमंडळाच्या नियमांचे कायदेकानून चे काटेकोर पालन, संसदीय परंपरांचे-शिष्टाचारांचे भान,उपस्थित करावयाच्या विषयाचे सर्वकष आकलन,विधिमंडळात विषय मांडताना वापरलेले कौशल्य,संसदपटुत्व,निवडलेले मुद्दे आणि विषय मांडण्याची पद्धत,वक्तृत्व शैली, वेगळ्या उंचीची दर्जेदार उत्कृष्ट संसदीय भाषणे या सगळ्या बाबी पडताळून पाहून पुरस्कारांसाठी नेमलेल्या तज्ञ समितीकडून या पुरस्काराची शिफारस केली जाते. आणि त्यानुसार राष्ट्रकुल संसदीय मंडळाकडून हे पुरस्कार जाहीर केले जातात. हडपसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चेतन तुपे पाटील यांना त्यांच्या पहिल्याच टर्ममध्ये हा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार जाहीर झाल्यानंतर विधानसभा मतदारसंघात सर्वत्र त्यांचे कौतुक केले जात आहे.

ज्येष्ठ नागरिकांना आरोग्याबाबत मार्गदर्शन

पुणे । प्रतिनिधी

उतारवयात होणारे विविध आजार, त्याबाबत घ्यावयाची काळजी आणि त्यावरील औषधोपचार याबाबत डॉ. संदीप बोरसे यांनी ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी डॉ. बोरसे यांच्या आरोग्यविषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. बोरसे यांनी अर्धांगवायू , हृदयविकार, मेंदुविकार , मज्जासंस्था, सांधेदुखी आदी आजाराविषयी माहिती देऊन त्यावरील उपचाराबाबत ज्येष्ठांना मार्गदर्शन केले. शनिवार दि. ३१ रोजी कै. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ सामुहिक प्रार्थनेने करण्यात आला. पाहुण्यांचे स्वागत असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार आणि कोषाध्यक्ष सुभाष पाटील यांनी केले. सुत्रसंचलन शकुंतला शिंदे केले. चित्रपट कलावंत उमेश धूत आणि असोसिएशनच्या सभासदांनी याप्रसंगी विविध गाणी, नाट्यछटा सादर करुन उपस्थित ज्येष्ठांचे मनोरंजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश चांडगे, सुभाष विधाते, अशोक येळंबकर, जयपाल सिदनाळे, विजय रोकडे, अशोक वारकर, निर्मला कासार, शोभा राजगुरे यांचे सहकार्य लाभले. ज्येष्ठ सभासद विनायक केलो, रमेश वाणी, विलास जोशी, आर के पाटील, यांची विशेष उपस्थिती होती.